# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०/३/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२५) इतिवृत्त

**मंगळवार** दिनांक **२० मार्च २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी १२.१५ वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गायकवाड दिलीप नारायण
3. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
4. सौ. दलाल लता श्रीनिवास
5. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
6. श्री. मुजीब आलमशाह खान
7. श्री. पांडे विनायक प्रभाकर
8. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
9. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
10. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
11. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
12. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
13. श्री. मो. जावेद मो. इसाक
14. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : मागिल वर्षी सिडको हस्तांतरण झाले. सिडको कार्यालयात किती कर्मचारी आहेत, तेथे कोणकाणती कामे केली जतात, ते करून घेण्यासाठी कुणावर जबाबदारी आहे.

मा. सभापती : शहर अभियंता यांनी खूलासा करावा.

शहर अभियंता : १ एप्रिल पासून सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले. सिडको विभागामध्ये एक उपअभियंता दोन क. अभियंता तसेच त्यांचे अंतर्गत काम करणारे क. लिपीकांचा वर्ग दिलेला आहे.

श्री.रविकांत गवळी : सिडको कार्यालयात वार्ड ब व ई चे कर्मचारी वगळता सिडकोचे हस्तांतरण केले. तेथे काम करण्यासाठी किती अधिकारी कर्मचारी दिलेले आहे.

मा. आयुक्त : सिडको हडको विभाग चार वार्ड कार्यालयामध्ये विभागला गेलेला आहे. वार्ड कार्याल अ मध्ये कमी आहे. वार्ड कार्यालय ब, ई तसेच फ मध्ये जस्त भाग आलेला आहे. त्या त्या नूसार त्या वार्ड कार्यालयात त्या त्या भागातील मालम्ता कर वसूली साफसफाई , तसेच तांत्रिक कामे त्या वार्डचे अभियंता कर्मचारी करतात. नगररचना विभाग वार्ड कार्यालयाकडे दिलेला नाही. तेथे या विभागाचे कर्मचारी जवून आवक

जवक करतो जेणे करून त्या संदर्भात नागरीकांना मुख्य कार्यालयात येण्याची गरज भासू नये.

श्री.रविकांत गवळी : श्री. साटोटे यांनी कशासाठी नियुक्ती केलेली आहे.

मा. आयुक्त : मालमत्ता तसेच अतिक्रमणाचे प्रमुख म्हणून तसेच ज्या काही सिडको भागातील मोकळया जगा असतीत त्यांचे रेकॉर्ड वेळेवर मिळण्यासाठी त्यांची नियुक्ती केलेली आहे.१४ सुरक्षा कर्मचारी तसेच आणखी क. लिपीक तसेच एक वाहन त्यांना देणार आहोत.

श्री.रविकांत गवळी : सिडकोच्या ज्या ज्या जगेवर विकास करण्या संदर्भात दिले तर जगा हस्तांतर झालेली नाही. पजेशन घेतलेले नाही कागदोपत्री कार्यवाही चालू आहे. अशी उत्तरे मिळतात महापालिकेतून संचिका सिडको कार्यालयात जते. तेथे कूणीही कर्मचारी नाही.पून्हा मुख्य कार्यालयात संचिका येते.एक कर्मचारी नियुक्त केले दुपार नंतर ते या कार्यालयात येवून बसतात.कार्यालयासाठी लाखो रूपये खर्च केले असे असेल तर कार्यालय करून उपयोग नाही. तेथे फर्निचर नाही.

मा.आयुक्त : सेंट्रलची जी कामे आहेत त्यात अतिक्रमण तसेच नगररचना विभत्तगाचे काम आहे. श्री. साटोटे यांचेकडे अतिक्रमणाचे काम दिलेले आहे. त्यांना १४ कर्मचारी दिले एक लिपीक पण दिलेले आहे.

उपआयुक्त(महसूल) : श्री. गजनन साटोटे यांची सिडको भागातील अतिक्रमण काढण्यासाठी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना १४ सुरक्षा कर्मचारी तसेच एक लिपीक , एक शिपाई व सध्या प्रशासकीय अधिकारी रजेवर असल्यामूळे त्यांचेकडील वाहन दिलेले असून कार्यालयासाठी फर्निचर त्यांनी विकत घेतलेले आहे.

श्री.रविकांत गवळी : फर्निचर तसेच कर्मचारी काही उपलब्ध करून दिलेले नाही आपण स्वत: पाहणी करावी.

मा. सभापती : सभा संपल्यानंतर माझ्यासह आपण स्वत: सदर ठिकाणी पाहणी करू.सुविधा उपलब्ध नसेल तर देण्याचे आदेशीत करण्यात येईल.जगा पजेशन बाबत प्रशासन कार्यवाही करेल.

श्री.विनायक पांडे : भारतीय पुरातत्व विभागाने जे मॅप महापालिकेकडे दिला त्या संबधीची संपूर्ण कागदपत्रे त्यांनी आपल्याकडे केलेली आहे का? माझ्या वार्डातील ९० टक्के भाग रेग्यूलेटेड तसेच प्रोव्हीबीटेड भाग म्हणून दाखविलेला आहे. त्या विभागाची जेंव्हढी जेथून जगा आहे तेथून जगाच दाखविलेली नाही. जे मॅप दिला तो १०० टक्के चूकीचा आहे. संपूर्ण कागदपत्र दाखल केले की नुसता मॅप दाखल केलेला आहे.तेथील नागरीकांस परवानगीसाठी त्रास होतो आहे.

उपअभियंता(न.र.) : भारतीय पुरातत्व विभागाने १०० मीटर पर्यत प्रोव्हीबीटेड भाग तसेच ३०० मी. पर्यत रेग्यूलेटेड भाग म्हणून मॅप दिलेला आहे. ओनशिपचे काहीही कागदपत्र दिलेले नाही.

श्री.विनायक पांडे : असे असतांना मॅप का मान्य केलेला आहे. त्या विभागाने जेथे पार्कींग केले त्या जगचे मालक दुसरे आहेत. पांडे फॅमीलीची जगाआहे. सरंक्षित भिंतीच्या बाजूची जगा मुळ मालक दुसरे आहे. जर १०० मी. ३०० मीटर जगा दाखवित असेल तर सर्व नागरीकांना तेथील जगा सोडून निघून जवे लागणार आहे.

मा. आयुक्त : भारत सरकारकडून नोटीफिकेशन निघते त्यात बीबीचा मकबऱ्याचे नोटीफिकेशन असेल त्यात जे भाग येतो तेथून १०० व ३०० मी. पर्यतंचे कॅल्क्यूलेशन करता येईल.जे त्या विभागाच्या मालकीची जगा नसेल ती त्यांना विकत घ्यावी लागेल. जे नोटीफिशन काढले असेल त्या हद्य पासून १०० व ३०० मी. केंद्र शासनाचे जे नोटीफिकेशन निघेल त्यांची प्रत मागणी करून घेवू. तसेच बैठकीसाठी बोलवून घेवून त्यात दोन तीन वार्डाचा समावेश येवू शकतो. त्या स.सदस्यांना सुध्दा बैठकीसाठी बोलविण्यात येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : दि. २१.१२.०६ रोजी माधव घोरपडे यांनी २.८० लक्ष रू. घेतलेले आहे. माहितीच्या अधिकारात मी ३१.१२.२००६ रोजी माहिती मागविली अदयाप लेखा विभागाने माहिती का दिली नाही.

प्र.मुख्य लेखाधिकारी : या संबधीची संचिका नगररचना विभागाकडे आहे. त्या विभागाकडून व्हॉवचरचा दिनांक मिळाला तर माहिती पुरविण्यात येईल.

मा. आयुक्त : संबधीत अधिकारी यांना सूचना करतो की माहितीच्या अधिकारात माहिती मागविलेली असून वेळेच्या आत माहिती देण्याची कार्यवाही करावी. विभागा अंतर्गत माहिती घ्यावी व कळवावे.

मा. सभापती : माहितीच्या अधिकारात माहिती देणे आवश्यक आहे. स. सदस्यांना तात्काळ माहिती देण्याची व्यवस्था करावी.

सौ. लता दलाल : एक अनधिकृत बांधकाम माझ्या वार्डात होत असून त्या संदर्भात कोर्टात वाद चालू आहे. माहिती दिली असता थांबविले नाही. काम चालू आहे. दुसरे असे की , मागिल बैठकीत श्री. फड साहेब यांचे विभागाच्या संदर्भात आपण कार्यवाहीचे आदेशीत केले होते त्याची अमलबजवणी झाली का? स्पेक एजन्सीच्या संदर्भात या कार्यवाहीचे आदेशीत केले होते. काय कार्यवाही केली, किती कालावधीसाठी मूदतवाढ दिली होती सर्वे केला किती मालमत्तेत वाढ होवून महापालिकेला या वर्षात त्यामूळे किती उत्पन्न वाढलेले आहे. मागिल वेळेस हा मुद्या उपस्थित केला होता श्री. फड साहेब मागच्या बैठकीत उपस्थित नव्हते आज़ही उपस्थित नाही पूढील बैठकीच्या वेळेपर्यत ते बदलून गेलेले असतील.म्हणजेवारंवार विचारणा करून सुध्दा खूलासा होणार नसेल तर ही प्रशासनाची पध्दत बरोबर नाही. सामान्य नागरीकावर अन्याय होत असेल तर ते निदर्शनास आणून देणे हे आमचे कर्तव्य आहे. त्याची दखल घेतली जत नसेल तर मी निषेध करते.तसेच शहरातील किती ठिकाणच्या टपऱ्या काढल्यानंतर ग्रिनरी केलेली आहे.तसेच गेल्या सहा महिण्यात किती कर्मचाऱ्याच्या कोणत्या कारणास्तव बदल्या करण्यात आल्या. बदल्या करणे गरजेचे होते का याचाही खूलासा करावा.

उपआयुक्त(महसूल) : मिलकॉर्नर येथे राजस्थान फर्निचरच्या बाजूला एक अनधिकृत बांधकाम चालू असल्याची तक्रार शनिवारी प्रशासनास प्राप्त झाली होती.त्याच दिवशी इमारत निरीक्षक यांनी घटनेचा पंचनामा करून काम थांबविण्यास सांगितले होते. पून्हा काम सुरू झाल्याचे कळाले म्हणून मी स्वत: स्थळ पाहणी केली असता सदर व्यक्तीने माझेकडे मा. न्यायालयाचे आदेश आहे व त्यानूसार बांधकाम करीत असल्याचे अर्ज सादर केला. नंतर विधी सल्लागार यांचेकडे विचारणा केली की महापालिकेच्या

परवानगीशिवाय बांधकाम करावे असा कोर्टाचा आदेश आहे किंवा काय म्हणून माहिती मागविली आहे. विधी सल्लागार यांनी खूलासा केल्यानंतर आज दुपारी पुन्हा माहिती घेवून सदर व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.जर बांधकाम अनधिकृत असेल तर ते पाडण्याची कार्यवाही होईल.

श्री.मुजीब खान : जेंव्हा स. सदस्य लिगल बाबतीत मुद्या मांडतात तेंव्हा विधी सल्लागार कडून माहिती घेवून कार्यवाही करू असे सांगितले जते. एखादे बांधकाम पाडायचेच असेल तर कोणत्याही परीस्थितीत पाडले जते. त्यावेळी लिगल विभागाची गरज का पडत नाही.मीही अनेक बांधकामाच्या बाबत विचारणा केली असता लिगल/इलिगल चा मुद्दा पुढे करून तसेच प्रलंबीत ठेवलेले आहे. रोषनगेट ते आझाद चौक पर्यत मुख्य रस्त्यावर अनधिकृत बांधकाम चालू आहे.त्या जगेचा महापालिकेने मोबदला दिलेला आहे.अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकाम चालू आहे. प्रशासन दखल घेत नाही. विधी सल्लागार नगर सेवकांच्या कामासाठी चालढकल करीत आहे.

मा. सभापती : विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार :मिलकॉर्नर येथील बांधकामाच्या संदर्भात सदरील व्यक्ती माझेकडे आले त्यांनी मा. न्यायालयाची आदेश दाखवले. कोर्टाचे म्हणणे काय आहे याची विचारणा केली खालच्या कोर्टाने असे आदेशीत केले की अंडर सेक्शन २८४ प्रमाणे त्या व्यक्तीने दुरूस्तीसाठी मा. आयुक्ताची परवानगी घ्यावी.मा. उच्च न्यायालयाने जी परवानगी घेण्याचे आदेशास स्थगिती दिलेली आहे. चार आठवडे सुनावणीसाठी मॅटर प्रलंबीत ठेवले आहे. आर्डर संदिग्ध होती त्यामूळे इमारत निरीक्षक यांना सदर व्यक्ती दुरूस्तीचे काम करतात की अनधिकृत बांधकाम करीत आहे हे बघण्याचे म्हटले होते.

सौ. लता दलाल : बांधकाम करू नये की करावे, मा.आयुक्तांकडून परवानगी घेवू नये की घ्यावी, दुरूस्ती करावी की नाही कशाला स्थगिती उच्च न्यायालयाने दिलेली आहे.

विधी सल्लागार : दुरूस्ती करायची असेल तर त्यास मा. आयुक्तांची परवानगी घेण्याची गरज नाही बांधकाम करू शकता व अंतिम सुनावणीसाठी मॅटर चार आठवड्याने ठेवू असे म्हटले आहे.

सौ. लता दलाल :दुरूस्तीचे काम म्हणजे घराचा काही भाग पडला त्यास म्हणू शकतो परंतू पूर्ण स्ट्रक्चर तोडलेले असून बांधकाम चालू आहे त्यास दुरूस्तीचे काम म्हणता येत नाही. पूर्ण पाडून बांधकाम होत असेल तर त्यास रिपेरिंग म्हणता येत नाही.रिपेरिंग म्हणजेकाय याचा खूलासा करावा.

मा. आयुक्त : जेकाम चालू आहे त्यांचे छायाचित्र काढायचे व मा. न्यायालयास सादर करावे की आपल्या आदेशाचे उल्लघन करीत आहे.

श्री.संजय शिरसाट : परवानगी घेण्याचे कोर्टाने म्हटलेले होते. महापालिकेत न येता पून्हा वरच्या कोर्टात सदर व्यक्ती कशासाठी गेले कळायला मार्ग नाही. जेंव्हा उपआयुक्त जगेवर जतात दुरूस्तीचे काम होत आहे की नवीन अनधिकृत बांधकाम होत आहे यातील फरक कळाला असेलच.छायाप्रती घेईपर्यत पूर्ण आरसीसी टाकणार त्यानंतर ३० दिवसाची नोटीस देणार ते काम पाडणे अवघड होणार आहे.त्या कामाच्या संदर्भात अधिकारी

तसेच एक पदाधिकारी यांचा समावेश असल्याने जणून बजून दुर्लक्ष केले जत आह कन्टेम झाले तर होवू दया आजच्या आजबांधकाम पाडण्याचे आदेशित करावे.

मा. सभापती : दुरूस्तीचे ते काम होत नाही. नवीन अनधिकृत बांधकाम होत आहे त्वरीत पाडण्याची कार्यवाही व्हावी. कन्टेम्ट झाले तर छायाचित्र काढून न्यायालयाच्या निदर्शनास आणून दयावे.

मा. आयुक्त : चार आठवडे कन्टेम होण्याचे कारण नाही.कोर्टात प्रकरण चालू आहे.

श्री.संजय सिरसाट : शनिवारी उपआयुक्त महसूल यांना कळते इमारत निरीक्षक यांना पाडण्याचे आदेश दिले जते रविवारी उपआयुक्त स्वत: जतात. काम चालू होते. महानगरपालिकेच्या जगेवर काम होत आहे.

मा. आयुक्त : महापालिकेची जरी जगा असेल तर कोर्टाच्या मार्फतच कार्यवाही करावी लागेल. कोर्टात फोटो दयावे लागेल. त्यानंतर कोर्टाचे आदेश घेवून कार्यवाही करता येईल.

सौ. लता दलाल : दोन तीन वेळेस उपआयुक्त प्रशासकीय अधिकारी यांना अतिक्रमण काढण्यास कळविले तरी काढले नाही. रविवारी मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश दिले असतील असे वाटत नाही.

मा. आयुक्त : उपआयुक्त(महसूल) यांनी या प्रकरणाच्या बाबतीत अभ्यास करावा कोणत्याही परीस्थिती कन्टेम होवू नये. दोन टक्के जरी अतिक्रमण असेल तर त्याची छायाप्रत काढून न्यायालयासमोर ठेवून आदेश घेवू.

श्री.मुजेब खान : जेंव्हा कोर्ट निर्णय देते त्यात स्पष्ट आदेश केलेले असते. दुरूस्तीचेच काम असते तर किती नुकसान झाले व कोणते काम करायचे क्लिअर दिले असते. मा. कोर्टाने डायरेक्शन काय दिलेले आहे निर्णय काय आहे ते वाचून दाखवावे त्यानूसार चर्चा करता येतील.

सौ. लता दलाल : दुसरे एक जगेचे प्रकरण आहे. मोठया प्रमाणात अतिक्रमण काढले. जगा रिकामी केली परंतू त्या बाजूलाच एक व्यक्तीने ४०० ते ५०० क्वे. फुट जगा माझी आहे म्हणून काम थांबवून ठेवले.महापालिकेच्या नावाने त्या जगेचे पीआरकार्ड नसल्याने निश्चित किती जगा महापालिकेची आहे हे कळेना पोलीसात तक्रार केली त्या व्यक्तीला माहित झाल्यानंतर मा. कोर्टात प्रकरण दाखल केले न्यायालयाचे स्थगिती आणली. त्या जगेच्या संदर्भात महापालिका कॅव्हेट दाखल करू शकत होती ते का केले नाही.थोडेशा जगेमूळे संपूर्ण काम थांबलेले आहे. हे बरोबर नाही. २६ जनेवारी रोजे उद्घाटन झाल्यानंतर लगेच पेव्हींग ब्लॉक बसवायला पाहिजे होते. दीड महिण्यात १० हजर स्क्वे.फुटाच्या जगेवर पेव्हीग ब्लॉक बसण्याचे काम झाले नाही.अनेक वेळा संबधीत अधिकारी यांना सूचना करूनही काम केले नाही. अधिकारी राजकारण करू नये नसता त्याचा त्यांना त्रास होईल.

श्री.रविकांत गवळी : ऑक्टोबर नोंव्हेंबर मध्ये टेंडर होते. वर्क ऑर्डर होतात.१,२ टक्के पैसे भरण्याचे संबधीतांना लेटर दिले त्यांनी पैसे भरणाही केलेले आहे परंतू ठेकेदार २५-२५ कामे घेतात त्यामूळे काही कामे करीत नाही.त्यात पेव्हींग ब्लॉक, खुल्या गटारी व ड्रेनेज उद्यान विभाग अशी अनेक कामे आहे.

शहर अभियंता : स्पेसीफिक कोणते काम असेल तर त्यांची शहानिशा करता येईल.२ टक्के रक्कम भरणा केली असेल तर काम करण्यास अडचण नाही.

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | : वार्ड क्र. ४ मध्ये दोन ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसवायचे ठेकेदाराने २ टक्के पैसे भरणाही केले. अदयाप काम सूरू केले नाही.अशी प्रत्येक वार्डातील कामे थांबलेली आहे. |
| मा. सभापती | : संबधीत ठेकेदारांनी एक महिण्याच्या आत काम सुरू केले नाही तर ते काम रद्द करून दुसरी निविदा काढण्यात यावी. |
| श्री.रविकांत गवळी | : हडको कॉर्नर च्या बाजूला मूस्लीम कब्रस्थान असून तेथे अतिक्रमण झालेले आहे. स्थानिक नागरीकांचे म्हणणे आहे की अतिक्रमण काढण्यात यावे. या बाबत दोन वेळेस आपण निर्णय दिला त्याची अमबजवणी अदयाप झालेली नाही.सिडकोने महापालिकेकडे हस्तांतरण केले. ते अतिक्रमण सिडको की महापालिका काढणार आहे. |
| मा. सभापती | : श्री. फड साहेबांच्या विभागा संबधीत प्रश्न आहे ते उपस्थित नाही मा. आयूक्त खूलासा करतील. त्यांनी माझी परवानगी घेतलेली नाही. |
| मा. आयुक्त | : उपआयुक्त श्री. फड कार्यालयात आलेले आहे. एका प्रकरणात दोन तासात माहिती दयायची आहे म्हणून श्री.अयुबखान व ते काम करीत आहेत. तरी पण मा. सभापती यांची परवानगी घ्यायला पाहिजे आवशकता वाटलयास बोलवू शकतो. नंतर काम करतील. |
| सौ. लता दलाल | : सहा महिण्यात तांत्रिक विभागाचे किती कर्मचारी यांच्या बदली केली बदलीचे कारण काय व बदल्या करून कामात काही सूधारणा झाली का खूलासा करावा. |
| मा. आयुक्त | : कर्मचाऱ्याच्या बदल्या करणे ही प्रशासकीय बाब आहे. |
| मा. सभापती | : शहर अभियंता यांनी खूलासा करावा. |
| शहर अभियंता | :एप्रिल महिण्यात बदल्या केलेल्या होत्या या वर्षात आवश्यकतेनूसार बदल्या केलेल्या आहे. शहर अभियंता विभागातील एक अभियंता यांची ड्रेनेज विभागात बदली केली.इमारत निरीक्षकाच्या बदल्या केल्या तसेच श्री. कोल्हे हे पाणीपुरवठा विभागात बरेच वर्ष होते त्यामुळे त्यांची बदली केली. वार्ड फ कार्यालयात एक अभियंता कमी होते तेथे श्री. मोटे यांची बदली केली. वार्ड कार्यालय क मध्ये श्री. खालेद सैफुद्दीन यांची बदली केली होती त्यांची तब्बेत खरोब झाल्यामूळे त्यांना पुन्हा गुंठेवारीमध्ये देण्यात आले. श्री. उमाळकर यांची बदली करून त्यांचे जगी श्री. फड यांना देण्यात आलेले आहे. |
| सौ. लता दलाल | : ९ कर्मचारी निलंबीत केले होते त्यात श्री. फड होते या सर्वांना कामावर घेतल्यानंतर श्री. फड यांची एक वर्षात कितीदा बदली केली. |
| शहर अभियंता | :सिडको हस्तांतरण झाल्यापासून श्री. फड यांना नगररचना विभागात दिले होते. आतापर्यत त्याच विभागात ते होते. नुकतीच त्यांची बांधकाम विभागात बदली करण्यात आली आहे. |
| सौ. लता दलाल | : किती पदावर प्र.चार्ज म्हणून अधिकारी काम करीत आहे. नगररचना विभागात श्री. शेख हे काम करीत आहे त्यांचे बरोबर आणखी कर्मचारी दयावे म्हणून मागणी केली होती जेणे करून नगरसेवकांची कामे वेळेवर होतील. परंतू कूणीही दिले नाही. ठरावीक कर्मचाऱ्याच्या सोयीच्या ठिकाणी बदल्या केल्या जतात हा अरोप आहे. |

माझ्या वार्डातील तीन प्रकरणे भूसंपादनाची आहेत. त्या लोकांना अदयाप पैसे वेळेवर मिळत नाही.

मा. आयुक्त :याची दखल घेवून कार्यवाही होईल.

श्री. साहेबराव कावडे :जून्या पध्दतीनेच काम चालू आहे. अंदाजपत्रक तयार केल्यानंतर किती दिवसात मंजूर व काम सूरू व्हायला पाहिजे याचाही कालावधी असेल. वार्ड कार्यालयात विचारना केली असता वार्ड अभियंता सांगतात की संचिका पाठवून दिली आहे. शहर अभियंता विभागात त्या संचिकेकडे दुर्लक्ष केले जते. एक ठेकेदार जर २५ कामे घेत असतील तर कोणतेच काम वेळैवर होत नाही.त्यासाठी एका ठेक्ेदारास एकाच वेळी किती कामे दयायला पाहिजेकिती लक्षचे काम किती दिवसात व्हायला पाहिजेयाची माहिती दयावी.

मा. सभापती : जे पाच लक्षच्या आतील कामे आहे ती प्रभाग समितीच्याच अखत्यारीत व्हावी. त्यामूळे वार्डातील सदस्यांची कामे वेळेवर होतील. व कमीत कमी वेळेत संचिका मंजूरी होवून कामे होतील अशी रचना करण्याची गरजआहे प्रशासनाने याची दखल घ्यावी.

श्री.साहेबराव कावडे : माझ्या वार्डात स्लम विभागाचे ५ लक्षचे काम होते तीन वर्ष झाले अदयाप पूर्ण झालेले नाही.

उपअभियंता(स्लम) : सिमेंन्ट कॉक्रीटचे ३० लक्षचे काम असून स्वामी ठेकेदार करीत आहे. सहा महिण्याची मूदत दिलेली आहे. आणखी तीन महिण्यात काम पूर्ण होईल.

मा. सभापती : सदर काम तातडीने करण्याच्या सूंचना संबधीतास देण्यात याव्यात.

श्री.साहेबराव कावडे : आंबेडकर चौक तसेच हनुमान चौक मध्ये ६, ७ लक्ष सिमेंन्ट कॉक्रीटची दोन कामे होती तीन वर्ष झाले अदयाप काम पूर्ण झालेले नाही.एक ठेकेदार जस्तीचे कामे घेतात त्यामूळे कोणतेच काम वेळेवर पूर्ण होत नाही.

उपअभियंता(स्लम) : तीन वर्ष झालेले नाही एक वर्ष झाले.पावसाळा चालू झाला होता. मुख्य रस्त्यावरील काम आहे. त्या रस्त्याखाली मुख्य जलवाहिनी ड्रेनेजवाहिनी तसेच इतर लहान कामे अगोदर करावी लागली. आता काम पूर्ण झाले आहे.

मा. आयुक्त : कामाचे स्वरूप बघून कालावधी दिला जतो.ते किली लक्षचे आहे. सिमेंन्ट कॉक्रीटला सहा महिण्याची मूदत दिली जते. जितक्या रक्कमेचे रजिस्ट्रेशन असेल त्याचे चार पटी पेक्षा जस्त कामे घेता येणार नाही. पाच लक्षचे रजिस्ट्रेशन असेल चार लक्षचे पंचवीत कामे घ्यायचे ते आता घेता येत नाही.एक वर्ष कामास का उशीर झाला. महापालिकेकडून झाला की ठेकेदाराकडून झाला. ठेकेदाराची चूक असूल तर दंडात्मक कार्यवाही करावी.

श्री.साहेबराव कावडे :सबंधीत अधिकारी स्लम विभागात काम करण्यास इच्छूक नाही त्याची बदली करावी.

श्री.मो.जवेद मो.इसाक : मा.ना.ॲड.प्रितमकुमार शेगांवकर हे राज्यमंत्री आहेत. त्यांचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक सन २००७-०८ च्या डायरी मध्ये दिलेले नाही.

प्र.मुख्यलेखाधिकारी : अनावधानाने नाव टाकले गेले नाही. पर्सनल त्यांची माफी मागीतली आहे. स.ना. पुन्हा दुरूस्ती करून डायरीचे वाटप करण्यात येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : ज्यांचेकडे रेकॉर्ड आहे ते कोर्टात जतात. ज्यांचेकडे कागदपत्र नाही त्यांनी दंडेलशाही करायची व अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून ते प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करीत आहे. १०×१० ची टपरी रस्त्यावर बसलेली असून ती काढण्या संदर्भात सहा महिण्यापासून मागणी करीत आहे कार्यवाही होत नाही.

उपआयुक्त(महसूल) :साधारणत: दोन महिण्यापूर्वी कार्यवाही करण्याचे आयोजित केले होते परंतू पोलीस संरक्षण कमी असल्यामूळे ती कार्यवाही तात्पूरती मागे घेण्यात आली. नव्याने बदोबस्त करून १५ दिवसात कार्यवाही करून अहवाल दिला जईल.

श्री.साहेबराव कावडे : खामनदी प्रमाणे सुकना नदीच्या काठावर अनेक लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. या नदीच्या बाजूने ड्रेनेजलाईन गेलेली आहे. ती बदलण्याची वेळ आली तर बाजूला पर्यायी जगा नाही लोकांनीअतिक्रमण केलेले आहे.ते काढणार की नाही याचा खूलासा करावा.

मा. सभापती : उपआयुक्त महसूल यांनी यात लक्ष घालून त्वरीत कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र.280 :</u>**

दि. **5/1/2007**(का.प.क्र.19) रोजी तहकूब करण्यात आलेल्या व दि.**16/1/2007**(का.प.क्र.19) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : खाम नदीवरील १६५ घरांचे अतिक्रमण १५ दिवसात प्रशासन काढणार होते काय कार्यवाही केली. पावसाळयामध्ये ते काढता येणार नाही. शासनाचा जी. आर प्रशासन दाखवते.

श्री.पुनमचंद बमणे : एकूण १५० घरे नदीवर असतील.२ टक्के रक्कम भरून संबधीताने काम सुरू केले.सुरूवातीचे काम झाले शेवटचे बाकी आहे अतिक्रमणामूळे करता आले नाही.

मा. सभापती : नदीच्या पात्रातील अतिक्रमण त्वरीत काढण्याची कार्यवाही करावी.

सौ. लता दलाल : इतिवृत्तातील पान क्र ७ वर चर्चा झाली होती या शहरात किती हॉटेल आहे किती हॉटेल चालकाकडे लायसेन्स आहे व किती हॉटेलने अग्निशमन विभागाची एनओसी घेतलेली आहे.या बैठकीत माहिती देणार होते.

मा. आयुक्त : महापालिकेच्या रेकॉर्ड नूसार २५००चे जवळपास हॉटेल आहेत.

मुख्य अग्निशमन अधि. : हॉटेल असोशिएशन महापालिकेच्या विरूध्द कोर्टात गेलेले आहे. स्थगिती आदेश कन्टीन्यूव चालू आहे त्यामूळे एनओसी देणे थांबविलेले आहे.एक वर्ष झालेले आहे.

सौ. लता दलाल : स्थगिती आदेश व्हॅकेट होण्यासाठी काय कार्यवाही केली आहे.

विधी सल्लागार : या संदर्भात दोन मॅटर आहे एक साक्षी पुराव्यासाठी तर दुसरे हेरींगसाठी आहे.

मा.सभापती : चांगले वकील लावून या बाबत कार्यवाही करावी.

डॉ. आशा बिनवडे : मागिल इतिवृत्तात लाईनमन यांना महापालिकेच्या वतीने मोबाईल सेवा पुरविण्यात येणार होती. अद्याप त्यांना दिलेले नाही. तसेच बायोमेंडीकल च्या संदर्भात डॉ.परदेशी यांना वसूली अधिकारी श्री. पगारे यांनी घाणेरडया शब्दात वागणूक दिलेली होती. त्यांना विचारणा करून ॲक्शन घेणार होते त्या बाबतीत खूलासा करावा.

मा. आयुक्त : संबधीत कर्मचाऱ्याना बोलवून कार्यवाही केली जईल.

कार्य.अभियंता (पापू) : आठ दिवसात लाईनमन यांना मोबाईल दिले जतील.

| | |
|---|---|
| मा. सभापती | : पुढील बैठकीपर्यत संबधीत कर्मचाऱ्यांना मोबाईल देण्यात यावेत. |
| श्री.रविकांत गवळी | : पान क्र.२ वर मा.आयुक्तांनी खुलासा केला होता, त्याची अंमलबजवणी झाली का ?सिडकोच्या मालकीचे बालउद्यान आहे. महापालिकेकडे हॅडवर्क केले. परंतू त्या जगेवर खाजगी व्यक्ती लॉक लावतो. सदर उदयान लवकर सर्वासाठी खूले करणार होते. तसेच कब्रस्तानच्या जगेच्या तसेच खामनदीच्या संदर्भात कार्यवाही करणार होते ती झाली नाही. |
| मा. आयुक्त | : पुढील बैठकीत सर्व माहिती दिली जईल. |
| मा. सभापती | : पुढील बैठकीत प्रशासनाने माहिती सादर करावी. इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. |

**ठराव :**

दि. **5/1/2007** रोजीची तहकूब व दि.**16/1/2007** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.281 :** **(दि.27-2-2007 च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव-विषय क्र. 266)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नंदनवन कॉलनी येथे बॅडमींटन हॉल बांधणे करीता सा.बां.विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु.13,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समितीने ठराव क्र.153 दि.7-11-2006 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्या अन्वये सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/65/06 दिनांक 28-11-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 13 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक 18-12-2006 रोजी उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | आर. ए. वाहटुळे | 15% कमी दराने |
| 2 | स. मजीउद्यीन चिस्ती | 0.70% कमी दराने |
| 3 | मे. असेण्ड कन्स्ट्रक्शन | 2.70% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा 15% कमी दराची निविदा श्री.आर.ए. वाहटुळे यांची प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्तांनी सदरील निविदा प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार श्री.आर.ए.वाहटुळे यांची अं.प.दरापेक्षा 15% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नंदनवन कॉलनी येथे बॅडमींटन हॉल बांधणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 15% कमी दराची श्री. आर. ए. वाहटुळे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.282 :** **(दि.27-2-2007 च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव-विषय क्र. 267)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र सभागृहाचे नुतनीकरण करणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसुची नुसार र.रु.15,00,000/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.7-11-2006 ठराव क्र.1582 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र. मनपा/इ-निविदा/65/2006 दिनांक 28-11-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 19 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 09 निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.18/12/06 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1 | जाधव ए. एम. | 18.15% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 2 | मोना कन्स्ट्रक्शन | 23.86% कमी दराने |
| 3 | काझी मुबारीजोद्यीन | 24% कमी दराने |
| 4 | शेख सलीम अहेमद | 16.15% कमी दराने |
| 5 | एस. एम. इब्राहीम | 17.5% कमी दराने |
| 6 | शेख महंमद अझहर | 18% कमी दराने |
| 7 | स. मजीउद्यीन चिश्ती | 23.50% कमी दराने |
| 8 | देशमुख एस. ए. | 22.22% कमी दराने |
| 9 | मेट्रो असोसिएट्स | 16.84% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 24% कमी दराची निविदा काझी मुबारीजोद्यीन यांची प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार काझी मुबारीजोद्यीन यांची अं.प.दरापेक्षा 24% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र सभागृहाचे नुतनीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 24% कमी दराची काझी मुबारीजोद्यीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.283 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आंबेडकरनगर येथील स्मशानभुमी लगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रेखांकनातील दोन भूखंड अनुक्रमे क्रमांक **J-1/1** क्षेत्र 612.00 चौ.मी. व भूखंड क्रमांक **J-1/2** क्षेत्र 650.00 चौ.मी.(एकत्रित क्षेत्र 1262 चौ.मी.) असून या ठिकाणी या वॉर्डाचे स.नगरसेवक यांचे विनंतीनुसार महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाची मागणी व येथील जनतेची गरज विचारात घेऊन, तसा भूखंड खरेदीचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना सादर करण्यात आला होता. सदरचा प्रस्ताव मंडळाचे पत्रान्वये कळविलेल्या दर रूपये 1102/- प्रति चौ.मी. अनुसार सादर करण्यात आलेला होता.

सदरचा प्रस्ताव मंडळाच्या विचाराधीन असून, मंडळाने सदरचे भूखंड दरात वाढ केली असून, नवीन दर हा रूपये 1122/- प्रति चौ.मी. असा करण्यात आला आहे. पुर्वीचा कार्यालयीन प्रस्ताव हा एकूण रक्कम रूपये 14,75,724/- खर्चाचा होता व यास दि.28-8-2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्रमांक 87(कार्यक्रम पत्रिका क्रमांक 10) अन्वये घेतलेल्या ठरावास मंजुरी प्रदान करण्यात आली होती. तथापी उक्त नमुद प्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ त्यांच्या दरात वाढ केल्याने सदरच्या रक्कमेत रूपये 25,240/- (पंचवीस हजार दोनशे चाळीस फक्त) ची वाढ होऊन आता एकूण आवश्यक रक्कम रूपये 15,00,964/- (भूखंड शुल्क रू.14,75,724/- + मुद्रांक शुल्क रूपये 85,000/-) झाली आहे. या भूखंडावर महानगरपालिकेतर्फे बांधा, वापरा व हस्तांतर करा (B.O.T.) या तत्वावर आरोग्य केंद्र व दुकान केंद्र बांधण्याचा कार्यालयाचा मानस आहे. जेणे करून भूखंड खरेदीसाठी खची पडणारे रूपये 15,00,964/- वसुल होईल व या ठिकाणी बांधण्यात येणाऱ्या संकुलापैकीचा भाग आरोग्य केंद्र व दुकान केंद्रासाठी विनामुल्य, बांधकामासाठी कोणताही खर्च न करता प्राप्त होईल.

सदर सुधारीत रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून पुढील आवश्यक मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. करीता सुधारीत खर्च रूपये 15,00,964/- (पंधरा लक्ष नऊशे चौसष्ट फक्त) च्या खर्चास मंजुरी प्रदान करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकरनगर येथील स्मशानभुमी लगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रेखांकनातील दोन भूखंड अनुक्रमे क्रमांक **J-1/1** क्षेत्र 612.00 चौ.मी. व भूखंड क्रमांक **J-**

**1/2** क्षेत्र 650.00 चौ.मी.(एकत्रित क्षेत्र 1262 चौ.मी.) संपादीत करून बीओटी तत्वावर आरोग्य केंद्र व दुकान केंद्र बांधण्याकरीता भूखंड खरेदी प्रस्तावानुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी दरात वाढ केल्यामुळे लागणाऱ्या सुधारीत खर्च रूपये 15,00,964/- (पंधरा लक्ष नऊशे चौसष्ट फक्त) च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.284 :**

उप आयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला सिल्लेखाना व पडेगांव कत्तलखाना येथे 24 तासाकरीता एकूण 28 सुरक्षा रक्षक अनाधिकृत जनावरांचे कत्तल न होणे व तसेच मोहल्ल्यामध्ये कोणत्याही प्रकारचे चामडे, हाडे इत्यादी साठा करण्यात येवू नये याकरीता सदर ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करीता जाहीर निविदा मागविण्यात आली असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | सिल्लेखाना (8 तासांकरीता) रूपये | पडेगांव (8 तासांकरीता) रूपये |
|---|---|---|---|
| 01 | मे.परमवीर अ. हमीद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था | 4212/- सेवा कर वेगळा | 4270/- सेवा कर वेगळा |
| 02 | मे. मेडीएटर्स अजिंठा सेक्युरिटी प्रा.लि. | 4443/- सेवा कर वेगळा | 4443/- सेवा कर वेगळा |
| 03 | मे. ओम साई सर्व्हीसेस | 4551/- सेवा कर वेगळा | 4551/- सेवा कर वेगळा |

वरील दरापैकी सर्वात कमी दर मे. परमवीर अ. हमीद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था यांचे (8 तासांकरीता) दर सर्वात कमी असल्याने सदर संस्थेस चर्चेस बोलावून मा.आयुक्त यांनी दर कमी करण्यास सुचविले असता संस्थेने प्रत्येक सुरक्षा रक्षक (8 तासांकरीता) प्रतिमहा रू.4125/- मान्य केले. याशिवाय शासनाचा सेवा कर वेगळा राहील. सदर दर हे महाराष्ट्र सुरक्षा अधिनियम किमान वेतन कायद्यानुसार आहेत.

तरी सर्वात कमी दर असलेली संस्था मे. परमवीर अ. हमीद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था यांचे दर स्थायी समितीचे मान्यतेनंतर व पुढील वर्ष 2007-2008 करीता सुरक्षा व्यवस्थेसाठी प्राप्त दर मान्यतेकरीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संजय सिरसाट : किती दिवस अशा प्रमाणे ठेका देवून सुरक्षा रक्षक ठेवून खर्च करणार आहे. गेल्या सहा महिण्यात किती खर्च झालेला आहे.सिल्लेखाना मध्ये एकूण कत्तल करणारे किती लोक होते. महापालिकेला येणारे उत्पन्नातून किती खर्च यासाठी करणार आहे.

संचालक प्राणी संग्रहालय : २७ जूलै २००६ पासून २२ सुरक्षा रक्षक सिल्लेखाना येथे ठेवण्यात आलेले होते. या सुरक्षा व्यवस्था केली म्हणून येथील गोदाम हे पडेगाव मध्ये शिप्ट झालेले आहे. नाका बंदी केलेली आहे. ६ महिण्यात मोठा फरक दिसून आलेला आहे. पूढील काही कालावधीत मोठा फरक जणवेल.

श्री.संजय सिरसाट : सिल्लेखाना येथील कत्तल खाना पडेगाव येथे हलविण्यात यावा म्हणून तेथे २०×३० चे प्लॉट पाडून दिलेले आहे.सुविधा दिलेल्या आहे. तरी हा खर्च पुन्हा करण्याची गरजकाय? कत्तल करणारे सिल्लेखाना येथे किती लोक होते.

श्री.मो.जवेद मो.इसाक : प्लॉट दिले परंतू तेथे कोणत्याही पुरेशा सुविधा दिलेल्या नाही.

मा. आयुक्त : जनावराची कत्तल होवू नयेम्हणून नाका बंदी करावीच लागेल. तरच अनधिकृत कत्तल शुन्य टक्के होईल.

श्री.मुजीब खान : शहरात ४-५ वार्ड मिळून एक एक ठिकाणी करून महापालिकेच्या जगेवर १० ते १५ दुकानाचे एक मार्केट करावे. अनेक लोकांनी घराच्या समोरच मटन शॉप सुरू

केलेल्या असून त्याचें घाण पाणी ड्रेनेज मध्ये जेडण्यात येत आहे. ज्यांना जेथे वाटेल तेथे मटन शॉप उघडत आहे. घाण केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्याचे महापालिकेला अधिकार आहे परंतू तसे होत नाही. मार्केट करून दिल्यानंतर त्या व्यतिरिक्त कूठे विक्री होत असेल तर कार्यवाही करावी.

संचालक प्रांणी संग्रहालय : झोन वाईज मार्केट देण्याचे प्रपोजल तयार केलेले आहे. जगा उपलब्ध झाल्यानंतर लगेच कार्यवाही होईल.

श्री.मुजीब खान : १९८८ पासून प्रशासन मार्केट करण्याचे आश्वासन देत आहे. अनेक लोकांनी घरासमोर दुकाने थाटली आहे. इतर नागरीकांना त्यांचा त्रास होतो. घर आणि दुकाने एकाच ठिकाणी असल्याने जगेवर कत्तल केली जत आहे.

श्री.संजय सिरसाट : जनावराची कत्तल होवू नये म्हणून मा.आयुक्तांनी त्यांचे अधिकारात काही सुरक्षा रक्षक ठेवले होते. जे कत्तल करीत होते त्या लोकांना बोलवून मा. आयुक्ताशी वाटाघाटी होवून पडेगाव येथे जगा दिलेल्या आहे. तेथे बांधकाम होणार आहे. जनावनाची कत्तल होवू नये म्हणून सिल्लेखान्यात २२ सुरक्षा रक्षक आठ तासासाठी तैनात केले. त्यांचेवर ९० हजर दर महिण्याला खर्च होतो. सहा महिण्यापासून कर्मचारी आहे. कत्तल करू नये म्हणून हे कर्मचारी ठेवले आहे. जगा देवून जर पुन्हा सिल्लेखाना येथे जे कुणी कत्त्ल करीत असेल त्यांचेवर पोलीस कार्यवाही का होत नाही. सुरक्षा कर्मचारी बाजूला गेले तर कत्तल चालू करावी का? कर्मचारी काढून घ्यावे धाड टाकावी. जे कत्तल करतील त्यांचेवर पोलीस कार्यवाही करून त्यांचे प्लॉटही रद्द करावे. अशी कडक भुमिका महापालिकेने घ्यावी.

मा. आयुक्त : प्लॉट दिले आहे. सहा महिण्याची मूदत बांधकामासाठी दिलेली आहे.

श्री.संजय सिरसाट : जे कत्तल करणाऱ्यांना प्लॉट दिले तर कत्तल करण्याचा प्रश्न येत नाही. सुरक्षा रक्षक ठेवून महापालिकेचा खर्च का करीत आहे.

श्री.मो.जवेद मो.इसहाक: सुरक्षा रक्षक नियुक्त केल्यापासून कत्तल होत नाही. पडेगांव कत्तल खान्यात होत आहे. शहराच्या आरोग्यासाठी चांगली बाब आहे. प्लॉट दिले ते सर्व गरीब लोक आहे. तेथे पाणी, ड्रेनेज, लाईट या सुविधा दिल्या नाही. त्या देण्यात याव्यात.

मा. आयुक्त : पाण्याचे ऑलरेडी एक इंची कनेक्शन गोडावून मध्ये दिलेले आहे. पाणी नसेल तरी टॅंकर द्वारे देता येईल परंतू काम सुरू करायला पाहिजे

श्री.संजय सिरसाट : प्लॉट दिलेले आहे पाण्याची पाईप टाकलेली आहे. एवढी विनंती करण्याची गरज नाही. सिल्लेखान्यात अवैध कत्तल करीत आहे. प्लॉट दिले तर घरेही बाधूंन द्यावी. कशासाठी कर्मचाऱ्यावर खर्च करीत आहे.

श्री.मो. जवेद मो. इसाक: गरीब लोक आहे घरे बांधून दिली तर चांगली बाब आहे.

मा. आयुक्त : नाकाबंदी करण्यासाठी १ लक्ष दर महा खर्च करीत आहोत. प्लॉट कमी किमतीत दिले सर्वांना दिले. त्यांनी बांधकाम सुरू करावयास पाहिजे

श्री.संजय शिरसाट : अर्धे कर्मचारी ठेवावे. जेकत्तल करतील त्यांचे वर पोलीस गुनहा दाखल करावा.

श्री.त्र्यंबक तुपे : १ ते २ महिण्याची आणखी मुदत द्यावी. तेथे सुविधा द्याव्यात जर ऐकणार नसेल तर कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : पडेगांव येथे सुविधा द्याव्या लागेल. आताच घराजवळ आहे सोयीचे असते म्हणून कत्तल होते अशीही शंका येते. परंतू मार्ग काढतांना मटन मार्केट करावे लागेल.

कत्तलखाना शिफ्ट झाला पाहिजे पडेगाव येथेच कत्तल करण्याची परंपरा सुरू व्हायला पाहिजे

श्री.त्र्यंबक तुपे : शहरात अनेक गल्ली बोळात मांस विक्री होते. अनेक लोकांकडे लायसेन्स नाही. लायसेन्स देण्यासाठी मुदत द्यावी. महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

मा. सभापती : हा प्रस्ताव तुर्त स्थागित करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.285 :</u>**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जाफरगेट आठवडी बाजार फी वसूली सन 2007-08 या वर्षासाठी जा.क्र.मनपा/मामअ/211/2007 दिनांक 17/2/2007 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिली असता व प्रत्यक्ष बोली दि.23/2/2007 रोजी सकाळी 11.00 वाजता प्रशासकीय इमारत टप्पा क्र.3 मालमत्ता विभागात बोली सुरू केली असता सहा व्यक्तींनी बोलीत भाग घेतला आहे.

| | |
|---|---|
| 1) श्री.साजेद अली हमीद अली | सरकारी बोलीपेक्षा कमी बोली बोलण्यास तयार आहे. सरकारी बोली बोलण्यास नकार दिला. |
| 2) श्री. रियाजऊद्यीन खान | --- '' --- |
| 3) श्री.कचरूलाल गोकुळ आहेरगवळी | रू.21,000/- |

मनपाने जाफरगेट आठवडी बाजारासाठी आधारभुत किंमत रू.20,350/- प्रती बाजार ठेवली होती. प्रत्यक्षात बोलीमध्ये श्री.कचरूलाल गोकुळ आहेरगवळी यांनी रू.21,000/- प्रती बाजार अशी जास्तीची बोली बोलली आहे, जी की मनपाच्या आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

तेव्हा प्रती बाजार रू.21,000/- x 53 = 11,13,000/- अशी किंमत होते. अटी शर्ती नुसार त्यांच्याकडून बोलीच्या 25% आगाऊ रक्कम रू.2,78,250/- व बोलीच्या 25% राष्ट्रीयीकृत बँकेची र.रू.2,78,250/- ची बँक गॅरंटी घेऊन व करारनामा करून घेऊन संबंधीतास दिनांक 1-4-2007 ते दिनांक 31-3-2008 या कालावधीसाठी फी वसूली करण्यासाठी आदेश देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : विषय क्र २८५,२८६,२८७ मध्ये आधारभूत किमतीपेक्षा जस्त आलेले आहे. ही आधारभूत किंमत कूणी व केंव्हा तसेच कशाच्या अधारे ठरविली.

मा. सभापती : मागच्या वर्षीची किंमत कशी ठरविली व कशावरून ठरविली.

प्र.मालमत्ता अधि. : संत एकनाथ रंग मंदीर येथील वाहन तळ फिस सन २००६-०७ या वर्षासाठी प्रतिमहा ११००/- रू. रक्कम ठेवण्यात आली होती.१० टक्केनी वाढ केली. तसेच पार्कींगचे क्षेत्रफळ तसेच किती कार्यक्रम वर्षभरात होतात त्या अधारे किमत काढलेली आहे.

श्री.रविकांत गवळी : पैठणगेट येथील वाहन तळसाठी २५०० ठेवले ५००० आले. सलीम अली सरोवर येथे ५००० ठेवले १४०००/-रू. आलेले आहे.आधार भूत रक्कम ठेवतांना काही बेस धरला असेल.मागिल वर्षी च्या रक्कमेवर १० टक्के वाढ केली तर ५५०० होतात. त्यापेक्षा जस्त म्हणजे १४००० रू. आले. यावर पूढील वर्षी १० टक्कने वाढ करावी. वसुली कीती होती यावर किमंत ठरवायला पाहिजे

मा. आयुक्त : पूढील वर्षी १४०००/- वर १० टक्केची वाढ करून ऑक्शन काढले जईल.

श्री.साहेबराव कावडे : ज्यांनी टेंडर घेतले त्यांनी मागिल रक्कम भरणा केलेली आहे का?

मालमत्ता अधि. : त्यांचेकडे थकबाकी नाही.

श्री.साहेबराव कावडे :चिकलठाणा वाहन तळाचे ज्यांनी टेंडर घेतले होते त्यांचेकडे पैसे बाकी असतांना पून्हा त्यांनाच टेंडर दिले.

प्र. मालमत्ता अधि. : चिकलठाणा बाजर वाहन तळाचे मागिल वर्षी ज्यांनी ठेका घेतला होता त्यांनी पूर्ण पैसे भरणा केलेले आहे.जफरगेट तसेच शहानुरवाडी दर्गा या दोन बाजराचे पैसे येणे बाकी आहे.वसूली करण्याची कार्यवाही चालू आहे.

श्री. त्र्यंबक तुपे : शहरनूरवाडी बाजर वाहन तळ ज्यांचेकडे गेल्या वर्षी ठेका होता त्यांचेकडे बाकी असतांना त्यांना कसा मिळाला.किमान बाकी असलेले रक्कम भरणा करून घ्यावी.

मा. सभापती :ज्यांचेकडे मागिल थकबाकी आहे ती त्वरीत भरणा करून घ्यावी. या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-08 या वर्षासाठी जाफरगेट आठवडी बाजार फी वसूली करीता लिलाव बोलीमध्ये श्री.कचरूलाल गोकुळ आहेरगवळी यांची आधारभुत किंमतीपेक्षा जास्त म्हणजेच रू.21,000/- प्रती बाजार या बोलीस प्रस्तावात नमूद अटीनुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.286 :</u>**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळ फी वसूली सन 2007-08 या वर्षासाठी जा.क्र.मनपा/मामअ/211/2007 दिनांक 17-2-2007 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिली असता व प्रत्यक्ष बोली दिनांक 26-2-2007 रोजी सकाळी 11.00 वाजता प्रशासकीय इमारत टप्पा क्र.3 मालमत्ता विभागात बोली सुरू केली असता सहा व्यक्तींनी बोलीत भाग घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. साजेद अली हमीद अली | सरकारी बोलीपेक्षा कमी बोली बोलण्यास तयार आहे. सरकारी बोली बोलण्यास नकार दिला. |
| 2. | श्री. रियाजउद्दीन खान | सरकारी बोलीपेक्षा कमी बोली बोलण्यास तयार आहे. सरकारी बोली बोलण्यास नकार दिला. |
| 3. | सौ.सिंधु जवाहरलाल खरे | रू.12,150/- प्रती महिना |
| 4. | श्री. मो. शोएब मो. शफी | सरकारी बोलीपेक्षा कमी बोली बोलण्यास तयार आहे. सरकारी बोली बोलण्यास नकार दिला. |
| 5. | श्री. शेख बशीर शेख छोटे | सरकारी बोलीपेक्षा कमी बोली बोलण्यास तयार आहे. सरकारी बोली बोलण्यास नकार दिला. |
| 6. | श्री. शेख इरफान शेख इफसाकऊद्दीन | रू.12,200/- प्रती माह |

मनपाने संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळासाठी आधारभुत किंमत रू.12,100/- प्रती माह ठेवली होती. प्रत्यक्षात श्री.शेख इरफान शेख ईसाकऊद्दीन यांनी रू.12,200/- प्रती माह जास्तीची बोली बोलली आहे जी की मनपाच्या आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहे.

तेव्हा प्रती महिना 12200 x 12 = 1,46,400/- अशी किंमत होते. अटी शर्ती नुसार त्यांच्याकडून सहा महिन्याचे आगाऊ भाडे रू.73,200/- व 25% राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी रू.36,600/- घेऊन व करारनामा करून घेऊन नंतरच श्री.शेख इरफान शेख ईसाकऊद्दीन यांना दि.1-4-2007 ते 31-3-2008 या कालावधीसाठी फी वसूली करण्यासाठी आदेश देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-08 या वर्षासाठी संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळ फी वसूली करीता झालेल्या लिलाव बोलीमध्ये श्री.शेख इरफान शेख ईसाकऊद्दीन यांच्या आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त

म्हणजेच रू.12,200/- प्रतीमाह या बोली रक्कमेस प्रस्तावात नमूद अटीनुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.287 :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पैठणगेट वाहनतळ फी वसूली सन 2007-08 या वर्षासाठी जा.क्र.मनपा/मामअ/211/2007 दिनांक 17-2-2007 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिली असता व प्रत्यक्ष बोली दिनांक 26-2-2007 रोजी सकाळी 11.00 वाजता प्रशासकीय इमारत टप्पा क्र.3 मालमत्ता विभागात बोली सुरू केली असता आठ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. मीर साजेद अली | रू.4100/- प्रती माह |
| 2. | श्री. रियाजउद्दीन खान | रू.4050/- प्रती माह |
| 3. | श्री. मो. शोएब मो. शफी | बोली बोलली नाही. |
| 4. | श्री. शेख बशीर शेख छोटुमियां | रू.4350/- प्रती माह |
| 5. | श्री. शेख इरफान शेख इफसाकऊद्यीन | रू.4300/- प्रती माह |
| 6. | श्री. लक्ष्मण भोलाराम बुंदीले | रू.3100/- प्रती माह |
| 7. | सौ.सिधु जवाहरलाल खरे | रू.4250/- प्रती माह |
| 8. | श्री.कचरूलाल गोकुळ अहिरगवळी | बोली बोलली नाही. |

मनपाने पैठणगेट वाहनतळासाठी आधारभुत किंमत रू.2750/- प्रती माह ठेवली होती. प्रत्यक्षात श्री.शेख बशीर शेख छोटेमिया यांनी रू.4350/- प्रती माह जास्तीची बोली बोलली आहे जी की मनपाच्या आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहे.

तेव्हा प्रती महिना 4350 x 12 = 52,200/- अशी किंमत होते. अटी शर्ती नुसार त्यांच्याकडून सहा महिन्याचे आगाऊ भाडे रू.26100/- व 25% राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी रू.13050/- घेऊन व करारनामा करून घेऊन नंतरच श्री.शेख बशीर शेख छोटेमिया यांना दि.1-4-2007 ते 31-3-2008 या कालावधीसाठी फी वसूली करण्यासाठी आदेश देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-08 या वर्षासाठी पैठणगेट वाहनतळ फी वसूली करीता झालेल्या लिलाव बोलीमध्ये श्री.शेख बशीर शेख छोटेमिया यांची रू.4350/- प्रती माह अशी जास्तीच्या बोली रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.288 :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-12 वाहनतळ व प्रवेश शुल्क फी वसूली सन 2007-08 या वर्षासाठी जा.क्र.मनपा/मामअ/211/2007 दिनांक 17-2-2007 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिली असता व प्रत्यक्ष बोली दिनांक 26-2-2007 रोजी सकाळी 11.00 वाजता प्रशासकीय इमारत टप्पा क्र.3 मालमत्ता विभागात बोली सुरू केली असता आठ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. मीर साजेद अली | रू.8000/- प्रती माह |
| 2. | श्री. रियाजउद्यीन खान | रू.7800/- प्रती माह |
| 3. | श्री. मो. शोएब मो. रफीक | रू.12100/- प्रती माह |
| 4. | श्री. शेख बशीर शेख छोटुमियां | रू.7100/- प्रती माह |
| 5. | श्री.कचरूलाल गोकुळ अहिरगवळी | रू.6000/- प्रती माह |
| 6. | श्री. लक्ष्मण भोलाराम बुंदीले | रू.7900/- प्रती माह |
| 7. | सौ.सिधु जवाहरलाल खरे | रू.12500/- प्रती माह |
| 8. | श्री.शेख इरफान शेख इसाकऊद्यीन | बोली बोलली नाही. |

मनपाने सदरील वाहनतळासाठी आधारभुत किंमत रू.5610/- प्रती माह ठेवली होती. प्रत्यक्षात सौ.सिंधु जवाहरलाल खरे यांनी रू.12500/- प्रती माह जास्तीची बोली बोलली आहे जी की मनपाच्या आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहे.

तेव्हा प्रती महिना 12500 x 12 = 1,50,000/- अशी किंमत होते. अटी शर्ती नुसार त्यांच्याकडून सहा महिन्याचे आगाऊ भाडे रू.75,000/- व 25% राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी रू.37,500/- घेऊन व करारनामा करून घेऊन नंतरच सौ.सिधु जवाहरलाल खरे यांना दि.1-4-2007 ते 31-3-2008 या कालावधीसाठी फी वसूली करण्यासाठी आदेश देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-2008 या वर्षाकरीता डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-12 वाहनतळ व प्रवेश शुल्क फी वसूली करीता झालेल्या लिलाव बोलीमध्ये आधारभुत रक्कमेपेक्षा जास्तीचे बोलीधारक सौ.सिंधु जवाहरलाल खरे यांची रू.12,500/- अशी जास्तीची बोली स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.289 :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सन 2002-03 या आर्थिक वर्षाकरीता हर्सुल तलाव येथील माती विक्रीचा ठेका रक्कम रू.1,68,000/- मध्ये श्री.साहेल सिद्यीकी यांना देण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी रू.80,000/- चा पहिल्या हप्त्याचा भरणा दि.4-4-2002 रोजी भरणा केला आहे. त्यानंतर साहेल सिद्यीकी यांनी कार्यादेश घेऊन कामास सुरूवात केली असता तेथील लोकांनी कामात अडथळा आणला होता. श्री.साहेल सिद्यीकी यांनी दि.20-2-2002, 24-2-2002, 26-4-2002, 30-4-2002 व 24-8-2003 रोजी पत्र देऊन अनामत रक्कम परत मागीतली होती व काम सुरू करू न शकल्यामुळे मुदतवाढ मागीतलेली होती. तेथील टरबुज-खरबुज(माळवा) लावणारे लोकांचे अतिक्रमण काढण्यासाठी पत्र देऊन कळविले होते. त्यांनी त्यावेळी उर्वरीत रक्कम रू.88,000/- भरलेली नसल्याने व सन 2002-03 ते 2004-2005 च्या लेखा परीक्षणात आक्षेपआल्याने संबंधीताकडून रक्कम रू.63,000/- त्यांच्या मनपाच्या इतर कामाच्या देयकातुन वजा करून तसेच निविदा अनामत रक्कम रू.25,000/- जप्त करून त्यांच्याकडून एकूण रू.88,000/- वसूल करण्यात आलेले आहेत.

परंतु संबंधीताने रक्कम रू.63,000/- कपात करताना मा.आयुक्तांकडे तोंडी आक्षेप घेऊन माझी रक्कम रू.63,000/- परत करावे अशी विनंती केली. त्यावर मा.आयुक्तांनी दि.28-4-2006 रोजी सुनावणी ठेवून पुरावे घेऊन त्यांची रक्कम परत करण्यासाठी आदेशीत केले होते. मा.आयुक्त यांनी दि.6-10-2006 रोजी चर्चा करून निविदा रक्कमेच्या निम्मी रक्कम परत करण्यासाठी मान्यता दिली आहे. सदर ठेक्याची(कामाची) निविदा रक्कम रू.1,68,000/- आहे. त्याच्या निम्मी रक्कम रू.84,000/- श्री.सोहेल सिद्यीकी यांना विजया बँकेचा धनादेश क्र.113846 दिनांक 27-10-2006 देऊन रक्कम रू.84,000/- परत करण्यात आलेले आहेत. मा. आयुक्त यांचे आदेशानुसार मा.स्थायी समितीस अवगत करण्यासाठी सादर.

**संवाद :**

श्री. मुजीब खान : सोहेल नावाचे ठेकेदार आहे त्यांनी हर्सूल येथील माती उचलण्याचा ठेका घेतला होता त्यांना माती उचलून दिली नाही. ज्या लोकांनी अतिक्रमण केले तेही आजपर्यंत काढले नाही.त्यांनी पैसे परत करण्याची मागणी केली. अर्धे पैसे दिले त्यांची मंजूरी आज घेत आहोत.अर्धे रक्कम आजही बाकी आहे. का दिले जत नाही खूलासा करावा. पुर्वी मंजूरी का घेतली नाही?

प्र.मालमत्ता अधि. :सन २००२-०३ या आर्थिक वर्षासाठी श्री. साहेल सिद्दीकी यांना १.६८ लक्ष मध्ये ठेका दिला होता. ८० हजर रू. महापालिकेकडे त्यांनी जमा करून कामाला सुरूवात केली. त्यानंतर त्यांनी अर्ज देवून विनंती केली की तेथे टरबूज लावलेले असल्यामूळे माती उचलता आली नाही. त्यानंतर लेखा परीक्षणामध्ये हा मूद्दा आलेला होता.

श्री.रविकांत गवळी : संबंधीतांनी पैसे भरणा केले त्याबदल्यात किती माती उचलली किती रक्कम मागविली होती. किती देण्यात आली व बाकी किती आहे. संबंधीताने ६३ हजर रूपये परत मागणी केली असे असतांना ८८ हजर कोणत्या बेसवर देत आहात.

प्र.मालमत्ता अधि. : लेखापरीक्षणामध्ये संबंधीत ठेकेदाराकडून वसुली करावी म्हणून मुद्दा आला होता. संबंधीताने काही प्रमाणात माती उचललेली आहे.

श्री.मुजीब खान :संबधीताने तसे म्हटले नाही प्रशासनाने लिहिले आहे.

मा. आयुक्त : जी रक्कम मिळाली होती त्यातील ६३ हजर दुसऱ्या देयकातून घेतले होते. २५ हजर अनामत रक्कम घेतली होती. व बाकीचे रक्मम त्यांनी जमा केली होती.६३ हजर दुसऱ्या कामाचे देयक होते ते क्लिअर झाले.

मा. सभापती : दुसऱ्या देयकातून पैसे जमा करून घेतले का खूलासा करावा.

शहर अभियंता : ६३ हजर दुसऱ्या देयकातून जमा करून घेतले. २५ हजर अनामत रक्कम जप्त केली असे मिळून ८८ हजर होतात ते परत केलेले आहे.पूर्ण पैसे परत करायचे नाही त्यांनी काही माती उचललेली आहे.

श्री.मुजीब खान : ऑर्डर दिल्यानंतर लगेच दुसऱ्याच दिवशी माती उचलण्यासाठी गेले असता माती उचलून दिली नाही. अर्ज देवून पोलीस मागणी केली आपल्या कर्मचाऱ्यानीच टोकरे फावडे उचलून आणले.एक गाडी सुध्दा माती संबधीताने घेवून गेले नाही. आज्ही तेथे मल्लाह लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. मातीला हात लावून देत नाही.ठेकेदारानी जी अनामत रक्कम भरलेली आहे ती परत करावी.

शहर अभियंता : संबधीतानी १.६८ लक्ष भरणा केले की नाही याची १० मिनिटात शहानिशा करून घेण्यात येते.

मा. सभापती : मा. आयुक्तानी या संबधी अभ्यास करून सर्व माहिती घेवून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2002-03 या आर्थिक वर्षाकरीता हर्सुल तलाव येथील माती विक्रीचा ठेका घेतलेले ठेकेदार श्री.साहेल सिद्दीकी यांनी कार्यादेश घेऊन कामास सुरूवात केली असता तेथील लोकांनी कामात अडथळा आणल्यामुळे व काम सुरू करू न शकल्यामुळे संबंधीतास सदर ठेक्याची (कामाची) निविदा रक्कम रू.1,68,000/- पैकी निम्मी रक्कम रू.84,000/- यांना परत करण्यात आलेल्या रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहातील चर्चेनुसार या प्रकरणी आयुक्तांनी पुन्हा तपासणी करून योग्य तो निर्णय घ्यावा असेही सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.290 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको टाऊन सेंटर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन 2005-06 च्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.11,97,900/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदरील रस्त्याचे काम यापुर्वी सिडको विभागातर्फे 3 वर्षापुर्वी करण्यात आल्याचे समजते. रस्त्याची एकूण लांबी 1329 आणि रूंदी 9 मीटर आहे.

प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे व स्थायी समिती समोर सादर करण्यास्तव आदेशीत केले आहे.

तरी सदर कामासाठी अंदाजपत्रक र.रू.11,97,900/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे सिडको टाऊन सेंटर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठीतयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,97,900/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.291 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.94 अंतर्गत विविध रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,99,240/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 9 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 6 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत. सदर काम यापुर्वी सन 2003 मध्ये केले होते. या कामांतर्गत एकूण रस्त्यांचे काम 597.00 लांबीचे होईल.

| | | |
|---|---|---|
| 1. | ए. सी. कोठारी | 4.98% जास्त दराने |
| 2. | डी. अजितसिंग | 11% जास्त दराने |
| 3. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 28.56% जास्त दराने |
| 4. | एम. ए. सिद्यीकी | 31% जास्त दराने |
| 5. | रे कन्स्ट्रक्शन | 32% जास्त दराने |
| 6. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 32.70% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी ए.सी. कोठारी यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 4.98% जास्त आहेत. सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रू.9,99,240/- पेक्षा जास्त म्हणजेच र.रू.10,49,000/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करून स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी श्री.ए.सी.कोठारी यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 4.98% जास्त दराने करून घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.94 अंतर्गत विविध रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 4.98% जास्त दराची ए. सी. कोठारी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.292 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, उड्डाणपुल (रेल्वेस्टेशन) रस्त्याची दुरूस्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,94,777/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 7 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 5 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत. सदर उड्डाणपुल सप्टेंबर 2001 पासून महानगरपालिकेकडे देखभाल दुरूस्तीसाठी हस्तांतरीत झालेला आहे. उड्डाणपुलाच्या रस्त्याचे डांबरीकरणाद्वारे दुरूस्ती करणेचे काम महानगरपालिकेकडून प्रथमच होत आहे. प्रस्तुत उड्डाणपुल रस्त्याची दोन्ही बाजूची लांबी 350 मीटर व रूंदी 7.50 मीटर आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 20% जास्त दराने |
| 2. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 22% जास्त दराने |

3. के. बी. पाथ्रीकर 24% जास्त दराने
4. आदिनाथ कन्स्ट्रक्शन 26.86% जास्त दराने
5. एम. ए. सिद्यीकी 30% जास्त दराने

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 20% ने जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजार भावा प्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 13.78% जास्त दर येत आहेत. यामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,94,777/- पेक्षा जास्त म्हणजेच रू.17,00,845/- एवढा खर्च होणार आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.78% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उड्डाणपुल (रेल्वेस्टेशन) रस्त्याची दुरूस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.78% जास्त दराची मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.293 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दमडी महल येथे 100 फुट विकास योजना रस्त्यावर पुल बांधणे या कामाचे रक्कम रू.79,00,000/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून सदर कामासाठी **तिसऱ्या वेळेस निविदापत्रके मागविली** असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 2 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोनही निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यातआली असता त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. मे. राणा कन्स्ट्रक्शन 1.01% कमी दराने
2. मे. अन्सारी कन्स्ट्रक्शन 12% जास्त दराने

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मे. राणा कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1.01% ने कमी आहेत. यास मा.आयुक्तांनी शिफारस करून स्थायी समितीसमोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मे.राणा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.01% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दमडी महल येथे 100 फुट विकास योजना रस्त्यावर पुल बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1.01% कमी दराची मे. राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.294 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.94 बन्सीलालनगर प्रभागातील शाहूनगर येथील उद्यानामध्ये आरसीसी स्लॅबने आच्छादित पाण्याचा हौद असून सदर हौत वापरात नसल्याने ह्या हौदाच्या आडोशाने होणारा गैरवापर, त्यामुळे लगतच्या रहिवाशांना होणारा त्रास याबाबत ह्या भागातील नागरीकांनी व स.सदस्यांनी पत्र देवून सदरचा हौद तोडून जमीन/जागा उद्यान वापरायोग्य करावी म्हणून मागणी केली आहे. तरी सदर हौद तोडण्याच्या कार्यवाहीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 अन्वये स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असल्याने प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

डॉ. आशा बिनवडे : प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी केली का. हे पाडणे गरजेचे आहे की नाही. पाहणी करावी नंतरच निर्णय घ्यावा.

मा. सभापती : उपआयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी पाडणे गरजेचे आहे का हे पहावे त्यानंतर कार्यवाही करावी.

**ठराव :**

सदर प्रकरणात सभागृहात झालेल्या चर्चेनुसार उप आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करून त्यानंतर कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.295 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन दलासाठी नवीन पोर्टेबल फायर/डिवॉटरींग पंप (किर्लोस्कर के.डी.एफ.- 400/700 मॉडेल) खरेदी करण्यासाठीच्या प्रस्तावास स्थायी समितीकडून ठराव क्र.172 दिनांक 10-1-2006 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार राज्यस्तरीय व स्थानिक वृत्तपत्रांमधून जाहीर निविदा बोलावण्यात आल्या होत्या. त्यात एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यातील सर्वात कमी दराची निविदा M/s TIFIRE and Engineer's Services, Pune यांची होती. त्यांचे दर सर्वात कमी आणि चार पंपांसाठी रूपये 26,89,120/- असे होते. सदर दराने खरेदीस दिनांक 31.3.2006 च्या स्थायी समिती बैठकीत ठराव क्र.323 नुसार मान्यता मिळाली होती. दिनांक 31.3.2006 पासून एक वर्षासाठी संबंधीत ठेकेदारावर सदरील दर बंधनकारक होते. सदरील दरानुसार एकुण चार पंप खरेदी करण्यात आले. तथापी गतवर्षीचा पावसाचा अनुभव लक्षात घेता पावसाळ्यात आपतकालीन व्यवस्थापन करताना पंपांची कमतरता भासते आणि त्यामुळे नागरिकांच्या तक्रारीत वाढ होते आणि त्यांचा रोष पत्करावा लागतो, कारण त्यांच्या जिवीतास तसेच वित्तास धोका निर्माण झालेला असतो. त्यामुळे अग्निशमन दलासाठी तसेच प्रत्येक वार्डासाठी एक याप्रमाणे सहा वार्डासाठी किर्लोस्कर के.डी.एफ.400/700 मॉडेलचे सहा पंप खरेदी करणे आवश्यक आहे. त्यासाठी सहा पंप खरेदी करण्यास मा.आयुक्तांनी दि.23.2.2007 रोजी मंजुरी दिली आहे. सदर पंप जुन्या मंजूर दराने खरेदी करणे असून, M/s TIFIRE and Engineer's Services, Pune यांना विचारणा केली असता, ते जुन्या दरानेच सहा पंप देण्यास तयार आहेत.

तरी स्थायी समितीने मान्य केलेल्या जुन्या दरानेच अतिरिक्त सहा पंप खरेदी करण्याच्या प्रस्तावास मान्यता व्हावी तसेच **अग्निशमन साहित्य खरेदी** या लेखाशिर्षकांतर्गत ठेवण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीमधून **रूपये 40,33,688**/- च्या खर्चासही मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दलासाठी प्रत्येक वार्डासाठी एक याप्रमाणे सहा वार्डासाठी नवीन पोर्टेबल फायर/डिवॉटरींग पंप किर्लोस्कर के.डी.एफ.400/700 मॉडेलचे, **सहा पंप** स्थायी समितीने ठराव क्र. 323 दि.31/3/2006 नुसार मान्य केलेल्या जुन्या दराने, M/s TIFIRE and Engineer's Services, Pune यांच्याकडून खरेदी करणेस तसेच त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रू.**40,33,688**/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.296 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2006/प्र.क्र.118/2006/नवि-20 मंत्रालय, मुंबई 400032, दिनांक 12 डिसेंबर 2006 च्या निर्णयानुसार राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना मनपा संचलित रूग्णालयातून विनाशुल्क सेवा देण्याबाबत शासनाने मंजुरी दिली आहे.

तरी या शासन निर्णयानुसार औरंगाबाद मनपाच्या रूग्णालयातून व आरोग्य केंद्रातून ज्येष्ठ नागरिकांना (वय 60 वर्ष व त्यावरील) निःशुल्क सेवा देणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार, औरंगाबाद मनपाच्या रूग्णालयातून व आरोग्य केंद्रातून ज्येष्ठ नागरिकांना (वय 60 वर्ष व त्यावरील) निःशुल्क सेवा उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.297 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.84 मध्ये स.नं.52/53 गारखेडा येथील खुली जागा विकसीत करणे करीता सा.बां.विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रू.12,49,931/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समिती समोर सादर करणेस्तव शिफारस केलेली होती. स्थायी समिती सभेचा ठराव क्र.171 दि.24-11-2006 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/इ-निविदा/84/2007 दिनांक 5-1-2007 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 8 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. दि. 25-1-2007 रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | एल. के. कन्स्ट्रक्शन | 8.80% कमी दराने |
| 2. | मेट्रो असोसिएट्स | 5.68% कमी दराने |
| 3. | नजीबउल्ल हक्क कन्स्ट्रक्शन | 4.786% कमी दराने |
| 4. | पी. एस. जाजू | 10% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.80% कमी दराची निविदा एल.के.कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 8.80% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.84 मध्ये स.नं.52/53 गारखेडा येथील खुली जागा विकसीत करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 8.80% कमी दराची एल.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.298 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जुनाबाजार येथील आरक्षण क्र.62 येथे उद्यान विकसीत करणे करीता सा.बां.विभागाचे सन 2004-05 च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.49,97,060/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.161/7 दिनांक 20-1-2006 रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/इ-निविदा/55/06 दिनांक 4-11-2006 अन्वये फेर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 10 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या, त्या दिनांक 23-11-2006 रोजी उपस्थिती गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | साई कन्स्ट्रक्शन | 1% कमी दराने |
| 2. | अमन असोसिएट्स | 10% जास्त दराने |
| 3. | मेट्रो असोसिएट्स | 10.09% जास्त दराने |
| 4. | शहा कन्स्ट्रक्शन | 12% जास्त दराने |
| 5. | एस. एम. इब्राहीम | 12% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा 1% कमी दराची निविदा साई कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली असून मा.आयुक्तांनी त्यास स्थायी समिती समोर सादर करण्याची शिफारस केलेली आहे.

त्यानुसार साई कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 1% कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुनाबाजार येथील आरक्षण क्र.62 येथे उद्यान विकसीत करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1% कमी दराची साई कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.299 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील जलनिःसारण व्यवस्था ही जुनी झाली असून शहरात असलेल्या नाल्यातील मुख्य जलनिःसारण वाहिन्या मोठ्या प्रमाणात नादुरूस्त असल्याने या नाल्यात मोठ्या प्रमाणात मलमिश्रीत सांडपाणी वाहत आहे. शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने जुनी ड्रेनेज व्यवस्था तोकडी पडत आहे. नाल्यामधुन वाहणाऱ्या मलमिश्रीत पाण्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. मलमिश्रीत सांडपाण्यामुळे शहरात संसर्गजन्य, साथीचे रोग पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. महानगरपालिका क्षेत्रातील नाल्यातुन वाहणारे प्रदुषीत पाणी पुढे खाम नदीद्वारे गोदावरी नदीस मिळते, ज्यामुळे प्रदुषण महानगरपालिका क्षेत्रा व्यतिरिक्त लगतच्या खेड्यातही पसरत असल्यामुळे महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे महानगरपालिकेस वारंवार सुचनेद्वारे/नोटीस द्वारे असे कळविण्यात येत आहे की, नदी/नाल्यात वाहत असलेल्या मलमिश्रीत सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया करून, शुध्द झाल्यानंतरच नैसर्गिक नाला/नदीत सोडण्यात यावे आणि तसे औरंगाबाद महानगरपालिकेकडून हमीपत्र मागविण्यात येत आहे.करिता औरंगाबाद शहरातील अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज व्यवस्थेचा स्तर उंचावणे, आवश्यक ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे आणि मलजलशुध्दीकरण प्रक्रिया केंद्र बांधणे, दुषित ड्रेनेज पाणी नाल्यात वाहु न देणे, पर्यावरणाचा समतोल राखणे इत्यादी कामे करणे अत्यंत गरजेचे आहे.

औरंगाबाद शहरा करीता प्रथमतः 1972 साली भुमीगत जलनिःसारण योजना कार्यान्वित करण्यात आली. सदर योजना परिसर अभियांत्रिकी विभाग (म.जि.प्रा.) यांचे मार्फत पुर्ण करून तत्कालीन नगर परिषदेस हस्तांतरीत करण्यात आली. या शहराची लोकसंख्या सन 2001 मध्ये दोन लाख होईल असे गृहीत धरून ही योजना तयार करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात सन 1981 मध्ये शहराची लोकसंख्या 2 लक्ष पेक्षा जास्त झाली. आजमितीस शहराची लोकसंख्या अंदाजे दहा ते बारा लाखा पेक्षा जास्त झाली आहे. 1972 मधील जलनिःसारण व्यवस्थे मार्फत जमा होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी कांचनवाडी येथे ऑक्सीडेशन पॉंड विकसीत केलेले आहेत. सध्या ते बंद अवस्थेत पडून आहे.

सन 1982 साली महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर वाढते औद्योगिकीकरण व नागरिकरणामुळे हाणाऱ्या वाढीव लोकसंख्येचा विचार करून भविष्यातील सेवा सुविधा करिता शहा कन्सल्टंट, मुंबई यांचेकडून 1986 साली जलनिःसारण योजनेसाठी अहवाल तयार करून घेण्यात आला. त्यावेळी सदर योजनेचा अपेक्षित खर्च रू.65.26 कोटी होता. वेळोवेळी पुरेशी आर्थिक तरतुद उपलब्ध न झाल्यामुळे सदर योजना पूर्णपणे राबविणे, अंमलात आणणे शक्य झाले नाही. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी या योजनेतील काही मुख्य जलनिःसारण वाहिन्या, उप जलनिःसारण वाहिन्या व झाल्टा शिवारात मलजल शुध्दीकरण प्रक्रिया केंद्राचे काम टप्प्या टप्प्याने उपलब्ध तरतुदीनुसार हाती घेण्यात आले आहे.

अपूर्ण असलेल्या, कोलमडीस आलेल्या आणि नादुरूस्त मुख्य जलनिःसारण वाहिन्यामधून उघड्या नैसर्गिक नाल्यात आज मितीस साधारणतः 90 दशलक्ष लिटर्स(एमएलडी) सांडपाणी वाहते. याचा शहराच्या व लगतच्या परिसराच्या पर्यावरणावर आणि भूगर्भातील जलसाठ्यावर तसेच जमीनीच्या सुपिकेतेवर देखील

दूरगामी दुष्परिणाम होतात. या सर्व बाबी विचारात घेता सर्वसाधारण सभा विषय क्र.48/9 दिनांक 19-3-2003 चे ठरावानुसार शहरातील नाल्यातुन वाहून जाणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज व्यवस्थेचा स्तर उंचावणे, नविन ड्रेनेज व्यवस्था करणे, मेन सिव्हर लाईन टाकणे इत्यादी कामासाठी 170.00 कोटी रूपये तरतुद करणे व या कामासाठी कन्सल्टंट नेमणे असा निर्णय झालेलाआहे.

त्या अनुषंगाने दिनांक 4-11-2004 च्या स्थायी समिती ठराव क्र.116 अन्वये या कामासाठी सुमारे 170 कोटीचा निधी उभा करणे, स्पर्धेद्वारे येणाऱ्या कन्सल्टन्सीला द्यावयाचे शुल्क 2% दराने त्यांचेसह वाटाघाटी करून निश्चित करणे आणि त्यासाठी सन 2005-06 च्या अर्थसंकल्पात तरतुद करणेचा ठराव पारित झाला. त्याचप्रमाणे स्थायी समिती सभा दिनांक 24-8-2005 मधील ठराव क्र.42(ब) मधील ठरावानुसार औरंगाबाद शहरातील अस्तित्वातील जलनिःसारण योजना श्रेणीवाढ करून सुधारीत करणेसाठी प्रकल्प सल्लागार निवड करणेबाबत व त्यांना अदा करावयाचे शुल्क रू.3.40 कोटीचे खर्चास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार योग्य सल्लागाराची निवड करणेसाठी निविदा मागविणे, निवडलेल्या सल्लागार कडून योजनेचा सविस्तर तांत्रिक अहवाल, नकाशे, अंदाजपत्रके तयार करणे, त्यांनी तयार केलेल्या अहवालास थर्ड पार्टी, मान्यता प्राप्त सक्षम संस्थेकडून तपासणी करून घेणे आणि निविदापत्रकातील नमूद तीन भाग टास्क-I, टास्क-II व टास्क-III प्रमाणे आहेत त्यानुसार कामे करून घेणेचे ठरले आहे.

उपरोक्तनुसार कामे करून घेण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रकल्प संल्लागार निवड करणे करीता दिनांक 24-1-2006 रोजी निविदा काढण्यात आली. एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या आणि निविदा सादरीकरणच्या अंतिम दिवशी फक्त एकच वैप्को (WATER AND POWER CONSULTANCY SERVICES [INDIA] LTD.) यांची निविदा दर भरून प्राप्त झाली. दुसरे स्पर्धक महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांनी महाराष्ट्र शासनाकडे अपील करून काही अटी शिथील करून घेतल्या आणि दिनांक 7-11-2006 रोजी दर भरणा केलेली निविदा सादर केली.

वरील प्रमाणे प्राप्त दोन सिलबंद निविदा दिनांक 13/11/2007 रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **निविदा भरणाऱ्या सल्लागार संस्थेचे नांव** | **निविदेतील भरण्यात आलेली रक्कम रूपये** |
|---|---|---|
| 1. | WATER AND POWER CONSULTANCY SERVICES [INDIA] LTD. | **80,91,718/-** |
| 2. | महाराष्ट्र जिवन प्राधिकरण | **3,30,95,497/-** |

उपरोक्त प्रमाणे कमी दराची म्हणजेच रक्कम रू.80,91,718/- ची निविदा ही वैप्को WATER AND POWER CONSULTANCY SERVICES [INDIA] LTD. यांची आहे. ती स्विकारणेचा प्रस्ताव मंजुरीचे विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : १९६० पासूनची माहिति दिली आहे. २ टक्के प्रमाणे ८० लक्ष कशासाठी देत आहेत.याकामासाठी किती तरतूद केलेली आहे.

कार्य.अभियंता(ड्रेविइवउ):शहरासाठी वाढीव पाणीपूरवठा करण्याचे नियोजन आहे, येणारे पाणी वाढेल तसेच जलनिस्सारणाचे पाण्यातही वाढ होईल हे नॅचरल आहे. शहरातील संपूर्ण जलनिस्सारण वाहिण्यांचा स्तर उचांवण्यासाठी सिवरेज स्कीम नूसार त्यांचे डिजईन करण्यासाठी आतापासूनच नियोजन सूरू केले त्याचा एक भाग म्हणून कन्स्ल्टंटी सर्व्हीस साठी टेंडर काढले या दोन संस्थानी भाग घेतला होता. ही संस्था शहराच्या सिवरेज सिस्टीमचे संपूर्ण सर्वे ,डिजईन करणे, अंदाजपत्रक करणे काम सुरू होईल त्यावर सुपरव्हिजन करणे असे विविध कामे करून देणार आहे. त्यांनी जे टक्केवारी मागीतली त्यानूसार ही रक्कम आहे.या कामासाठी एक कोटीची तरतूद ठेवली आहे.

मा. आयुक्त : जेवढे पाणी शहरात येते त्यातील ८० टक्के पाणी हे ड्रेनेजमधून जारली वाहते. पुढील ३० वर्षासाठी पाण्याचे नियोजन करायचे असेल तर ३०० कोटी खर्च अपेक्षीत आहे. तसेच संपूर्ण शहराचे ड्रेनेजचे पाणी व्यवस्थीत जण्यासाठी ३०० ते ४०० कोटी खर्च लागेल परंतू तेवढा निधी महापालिकेकडे नाही. ड्रेनेजची स्कीम येईल असा अंदाजआहे त्यांचे डिजईन करण्यासाठी सर्वे करण्यासाठी तसेच अंदाजपत्रक तयार करून शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठवून पूढील ३ ते ४ वर्षात निधी उपलब्ध करून घेवून काम करावेल लागणार आहे नसता परीस्थिती गंभीर होईल.या बाबतीत सर्व काम करण्यासाठी एजन्सी निश्चित करायची आहे. तांत्रिकदृष्ट्या डिझाईन, सर्व्हे इ. सर्व पूर्तता करून केंद्र सरकारला योजना पाठवावी लागेल.

श्री.रविकांत गवळी : प्रस्ताव चांगला आहे दूमत नाही परंतू १७० चा प्रस्ताव ठेवला त्यापैकी ३.४०काटी मान्य झाले आहे. ८० लक्ष देवून सर्वे करून घेणार प्रत्येक कामासाठी खाजगी एजन्सी लावून सर्वे करणार आहेत का ?महापालिकेचे अधिकारी कर्मचारी यांचेकडून का केला जत नाही,एका कामाचा सर्वे करून घेतला होता ९ लक्ष दिले. तीन वेळेस सर्वेचे काम पून्हा केले. आजही व्यवस्थित झालेला नाही.हे काम करणे गरजेचे आहे परंतू खाजगी संस्थेकडून कशासाठी.

मा. आयुक्त : केंद्र शासनास प्रस्ताव पाठवावयाचा आहे. महापालिकेचे अधिकारी पूर्ण १०० टक्के सर्वे करूच शकत नाही.

श्री.रविकांत गवळी :महापालिकेच्या अधिकाऱ्यानी सर्वे करावा. चार सहा महिण्याचा वेळ द्यावा. ८० लक्ष सर्वे साठी खाजगी एजन्सीला देवू नये. हा प्रस्ताव मंजूर करू नये.

मा. आयुक्त : महत्वाचा प्रस्ताव आहे मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

श्री.संजय सिरसाट : यापूर्वी शहा कन्स्लटन्सीने सर्वे केला होता. परंतू आजकोणती लाईन कुठे आहे याचे उत्तर ठामपणे अधिकारी सांगू शकणार नाही. रेकॉर्ड नाही मॅप नाही. १७० कोटी लागणतील हा बेस कशाच्या अधारे काढलेला आहे.

कार्य.अभियंता(ड्रेविइवउ): शासकीय अभियांत्रिकी विदयालयाकडून रिपोर्ट तयार करून घेतलेला होता. ही अधारभूत रक्कम काढलेली आहे कमी जस्त होवू शकते.

श्री.संजय सिरसाट : १७० कोटी लागतील सर्वे केला असेल तर प्लॅन असेलच.

मा. आयुक्त : टेक्नीकली माहिती घेतली नाही तर डिजईन करता येणार नाही.हा सर्वे ४ वर्षापूर्वीच करायला पाहिजेहोता उशीर झालेला आहे.

श्री.रविकांत गवळी : १९७२ साली सर्वे केला होता. ६५ लक्ष खर्च येणार होता. सन २००१ मध्ये शहराची लोकसंख्या गृहीत धरले होते. ती तर १९८१ सालीच तेवढी झाली होती. सर्वे योग्य असेल हे कशावरून गृहीत धरणार आहे.

मा. आयुक्त :लोकसंख्येनूसार अंदाजपत्रक केले जते. २०३० पर्यत २५ लक्ष लोकसंख्या गृहीत धरली व मोठी औद्योगिक वसाहतीस चालना मिळाली तर २०२० मध्येही २५ लक्ष होवू शकते. सुविधेचा अभाव असेल तर २०५० मध्येही २५ लक्ष होवू शकते. या शहरात ड्रेनेजची स्थिती गंभीर आहे. ३०० ते ४०० कोटी खर्च लागेल. शासनाकडून मान्यता घेवून केंद्र शासनाकडून निधीची मागणी करावी लागेल. केंद्र शासनाची एजन्सी निश्चित करून हे काम करणे गरजेचे आहे. आपले लोक सर्वे करू शकणार नाही.

श्री.रविकांत गवळी : ३.४० कोटीस मान्यता घेत आहेत.

सौ.लता दलाल : पुढील १० वर्षाची लोकसंख्या गृहीत धरून यापूर्वी सर्वेचे काम करून घेण्यात आले होते. त्या पध्दतीने शहरात कुठल्याही पध्दतीने काम करण्यात आले नाही. त्या एजन्सीने सर्वे कागदपत्र दिली. त्यांचे नकाशे दिले त्याची संचिका आजही माझ्याकडे आहे दाखवू शकते. श्री राजभोज साहेब अभियंता म्हणून कार्यरत होते.अर्धवट स्थीतीत काम पडल्यानंतर आज जी परीस्थिती दिसून येते त्या प्रमाणे नाल्याची रूंदी किती असावी, प्रवाह कसा असला पाहिजे, किती कि. मी. पर्यत किती डायमीटरची पाईपलाईन टाकली पाहिजे शेवटी कितीची लाईन असावयास पाहिजे. चेंबर बांधतांना त्यांचे टर्न कसे असावेत हे सर्व सर्वेमध्ये होते. त्याप्रमाणे कोणतेही काम झाले नाही. करोडो रूपये पाण्यात गेले. त्यावेळची लोकसंख्येत व आजच्या लोकसंख्येत मोठा फरक झालेला आहे. हे काम करणे गरजेचे आहे परंतू महापालिकेकडे सक्षम अधिकारी आहे त्यांचेकडून हे काम का करून घेत नाही. कर्मचारी उपलब्ध नसेल तर स्थानिक घ्यावे.

मा. आयुक्त : आता सर्वे केल्यानंतर या एजन्सीचा रिपोर्ट केंद्र शासनाकडे पाठवला जईल या कामासाठी निधीची मागणी करावी लागेल.

सौ. लता दलाल : सर्वे करणेसाठी व काम करण्यासाठी आमचा विरोध नाही परंतू किती रक्कमेत काम व्हावे हे बघणे गरजेचे आहे. दोन एजन्सीचे दर आले आहे मोठा फरक दिसून येतो.

मा. आयुक्त : एमजेपीने त्यांचे इन्टरनल गाईड लाईन प्रमाणे दर दिलेले आहे. दुसरी एजन्सी ही केंद्र शासनाची आहे. योग्य दराने अंदाजपत्रक तयार करून मिळत आहे.सहा सात महिण्यात त्यांचा सर्वे होईल.

सौ. लता दलाल :सहा सात महिण्यात सर्वे झाला नाही तर मुदतवाढ देणार पून्हा लोकसंख्येत वाढ झाली असे एजन्सी उत्तर देणार पून्हा सर्वे करणार का?

मा. आयुक्त : ३० वर्षाचा ड्रेनेजलाईनचा प्लॅन करून देणार आहे. हा विषय रद्द करू नये १० वर्ष पूर्वीच हे काम व्हायला पाहिजे होते. १००० कोटीच्या कामाचा बजेट रिपोर्ट तयार करणारी स्थानिक कोणतीही एजन्सी नाही.

श्री.रविकांत गवळी : या शहरात हॉटेल किती आहे म्हणून पुण्याच्या एजन्सीला १६ लक्ष रू. सर्वेसाठी ठेका दिला. त्या एजन्सीने नगरच्या एका एजन्सीला तो ठेका अंतर्गत आठ लक्ष मध्ये देवून त्याही एजन्सीने हडकोतील एका व्यक्तीला ८० हजर मध्ये सर्वेचा ठेका दिला.अहवाल समोर येणार होता. याचा अर्थ १६ लक्षचा ठेका ८० हजर पर्यत आला.त्या प्रमाणेच डायरेक्ट यात कमी दर का होत नाही.

श्री. त्र्यंबक तुपे : अंदाजपत्रकही खाजगी संस्थेकडून तयार करून घेणार आहात अशी माहिती मिळाली असे असेल तर अधिकारी कर्मचारी यांचेकडे कोणते काम असणार नाही त्यांचेकडून याचा सहा महिने वर्षभरात सर्वेचे काम करून घ्यावे.महापालिकेकडे सक्षम अधिकारी नाही का?

मा. आयुक्त : खाजगी एजन्सीकडून अंदाजपत्रक तयार करण्याचे मान्य करू नये. परंतू हा विषय मंजूर करावा कारण १० वर्षापूर्वीच हे काम करावयास पाहिजेहोते जर पूर्वीचे रिपोर्ट असतील तर समांतर जलवाहिनी आणण्यासाठी जे प्रयत्न केले या कामासाठी केले असते. सक्षमता ही वेगवेगळी असते. हे काम करण्यासाठी महापालिकेचे अधिकारी सक्षम

नाही व इतर कर्मचारी वर्ग नाही. ही खाजगी एजन्सी नाही शासनाची एजन्सी आहे. ४०० कोटी महापालिका खर्च करू शकणार नसेल तर शासनाकडूनच निधी मिळविण्यासाठी पाठपूरावा करावा लागेल.

श्री.त्र्यंबक तुपे : शासनाचा निधी येण्यास चार पाच वर्ष लागतील. आज नाल्याची परीस्थिती गंभीर आहे. तोपर्यत कामच करणार नाही का?

मा. आयुक्त : जे निधी प्रत्येक वर्षी बजेट मध्ये नाल्यासाठी राहील कामाची स्थिती बघून ते काम करावेच लागेल.

मा. सभापती : या विषयाला तुर्त स्थगिती देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.300 :</u>**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केले आहे की, प्रभाग क्र.76 अंतर्गत मो.रामनगर, सिडको येथील श्री राज प्राथमिक शाळेच्या पाठीमागील नाला अतिक्रमणामुळे अरूंद होत असल्याने नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अं.प. रक्कम रू.30 लक्ष, सर्वसाधारण सभा दिनांक 13-10-2006 मध्ये विषय क्र.515 अन्वये मंजूर झाले आहे. निविदा सूचना क्र.72/06 दि.9-12-2006 अन्वये या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 17 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 8 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | ललीत डी. अधाने | 7.25% जास्त दराने |
| 2. | अलिफ असोसिएट | 11% जास्त दराने |
| 3. | मे. शहा कन्स्ट्रक्शन | 12% जास्त दराने |
| 4. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 13% जास्त दराने |
| 5. | मे. जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन | 23% जास्त दराने |
| 6. | मे. एस.एम. इब्राहीम | 25% जास्त दराने |
| 7. | एस. डी. कन्स्ट्रक्शन | 25% जास्त दराने |
| 8. | एस. बी. कन्स्ट्रक्शन | Short E.M.D. Not Open |

उपरोक्त निविदा पैकी अं.प.पेक्षा 7.25% जास्त दराची निविदा तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची आहे. प्राप्त निविदा दराऐवजी अंदाजपत्रकापेक्षा 3% जास्त दराने निविदा माय करणेची शिफारस मा.आयुक्तांनी दि.2-3-2007 रोजी केली आहे.

उपरोक्त नमूद शिफारशी नुसार ललीत डी. अधाने यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3% जास्त दराची निविदा मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मुजीब खान : ७.२५ टक्के पेक्षा ३ टक्के आणखी जस्त दराने देण्याचे म्हटले आहे.

कार्य. अभियंता(ड्रेविइवउ) : आठ निविदा आल्या त्यात ज्याची लोयस्ट होती त्यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता त्यांनी असे म्हटले की डीएसआरचे रेट वाढलेले असून सिमेटचे दरही वाढलेले आहे. त्यामूळे त्यांनी जस्त दराने करण्याचे क्लेम केलेला होता. नाल्याच्या साईडला हेंडलोड आहे. दोन मुद्दे गृहीत धरून मा.आयुक्तांच्या समोर वाटाघाटी करून ३ टक्के आणखी जस्त दराने मान्यता दिलेली आहे.

श्री. मुजीब खान : असे अनेक टेडरला मागिल महिण्यात मान्यता दिली. वर्क ऑर्डर अद्याप दिली नाही. १३,१५,२०,२१ टक्के जस्त दराने काम दिलेले आहे.त्यांचेसाठीही सिमेंटचे भाव वाढलेले आहे. सगळयांना सारखा न्याय द्यावा.

मा. आयुक्त : टेंडर भरण्याची जी शेवटची तारीख असते त्या दिवशी नंतर एस्कलेशन किंवा डिसकलेशन जे फार्मुला आहे तो लागू करावयास पाहिजे १०० टक्के हा विषय संपेल. १ एप्रिल पासून ती कार्यवाही आपण मंजूरी देत असाल तर करण्यात येईल.

मा. सभापती : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.76 अंतर्गत मो.रामनगर, सिडको येथील श्री राज प्राथमिक शाळेच्या पाठीमागील नाला अतिक्रमणामुळे अरूंद होत असल्याने नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 3% जास्त दराची ललित डी.अधाने यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.301 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, विभागीय आयुक्त कार्यालया समोरील नेहरू बालोद्यानाचे सुशोभीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.9,97,900/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर काम हे आमदार निधीतून प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 23 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 7 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. आर.बी.रूडसमुद्र | 4.5% जास्त दराने |
| 2. | प्रल्हाद पारधी | 5.75% जास्त दराने |
| 3. | संतोष मोटेगांवकर | 6% जास्त दराने |
| 4. | मुबारक पठाण | 7.86% जास्त दराने |
| 5. | के. एस. कन्स्ट्रक्शन | 16.6% जास्त दराने |
| 6. | यारखाँ अमजद जमील | 20.75% जास्त दराने |
| 7. | सुजात हाशमी | 25% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी श्री.आर.बी. रूडसमुद्र यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 4.5% ने जास्त आहेत. सदर दर हे प्रस्तुत कामाचे स्वरूप बघता तसेच बाजारभावात सिमेंटच्या झालेल्या दरवाढीमुळे सदरच्या 4.5% जास्त दरास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

यामुळे सदर कामावर अं.प.रक्कम रू.9,97,900/- पेक्षा जास्त म्हणजेच 10,42,805/- एवढा खर्च होणार आहे. तरी श्री. आर.बी.रूडसमुद्र यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.5% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभागीय आयुक्त कार्यालया समोरील नेहरू बालोद्यानाचे सुशोभीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 4.5% जास्त दराची श्री.आर.बी.रूडसमुद्र यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.302 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या कारभारात गती व अधिक सुसूत्रता आणण्यासाठी तसेच नागरिकांना तत्पर सेवा देण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेत ERP Solutions (Enterprise Resource Planning base Solutions) योजना अंमलात आणण्यासाठी सर्वसाधारण सभा दिनांक 11-8-2006 ठराव क्र.292/11 नुसार मान्यता झालेली आहे.

ही योजना अंमलात आणल्यामुळे महानगरपालिकेचे विविध विभाग, जसे की लेखा विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण, शहर अभियंता, नगर रचना व प्रशासन, मालमत्ता विभाग इत्यादी एका संगणकीय प्रणालीवर कार्यान्वीत करता येतील. त्यामुळे आंतर विभागीय माहितीची देवाणघेवाण शिघ्र व सुलभ होईल. या योजने अंतर्गत पाहिल्या टप्प्यात H. R. Accounting, Project Management and Estate Management करणे प्रस्तावित आहे. त्यामुळे लेखा विभाग, सामान्य प्रशासन, मालमत्ता विभाग व शहर अभियंता यांचे अंतर्गतचे विभाग एकाच संगणकीय प्रणालीवर कार्यान्वीत होतील.

या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण चौदा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या दिनांका पर्यंत केवळ चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेच्या तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 4-12-2006 रोजी उघडण्यात आल्या असता,

**M.S.S.I.D.C., Aurangabad.**

1. साक्षांकीत केलेली निविदा सादर केली नाही.
2. मुख्य Solution Provider(ERP Product Company) समवेतचे Consortium Agreement सादर केलेले नाही.
3. Compliance Matrix सादर केलेले नाही.

**Godrej infotech(Ltd.), Mumbai.**

1. साक्षांकीत केलेली निविदा सादर केली नाही.
2. मुख्य Solution Provider(ERP Product Company) समवेतचे Consortium Agreement सादर केलेले नाही.
3. Bank Solvancy सादर केलेले नाही.

**ABM Knowledgeware Ltd., Mumbai.**

1. मुख्य Solution Provider(ERP Product Company) समवेतचे Consortium Agreement सादर केलेले नाही.

**CMC Limited, Mumbai.**

1. CMC Limited, Mumbai यांनी परिपूर्ण तांत्रिक निविदा सादर केली.

अपुर्ण निविदा सादरीकरणा बाबत व अपूर्ण कागदपत्रे त्वरीत सादर करण्याबाबत सर्व संबंधीतास पुरेसा वेळ देऊन दिनांक 4-1-2007 रोजी सर्व संबंधीतांस Presentation सादर करण्यास्तव आमंत्रित करण्यात आले असता M.S.S.I.D.C., Aurangabad हे Presentation साठी हजर झाले नाहीत व उर्वरीत तिन्हीही निविदाधारकांनी त्यांचे Presentation सादर केले.

मुख्य Solution Provider (E.R.P. Product Company) समवेतचे Consortium Agreement सादर करणे ही निविदेतील मुख्य अट असूनही Presentation च्या दिनांकापर्यंत Godrej infotech Ltd., Mumbai व ABM knowledgeware Ltd., Mumbai यांनी Consortium Agreement सादर केले नाही. Presentation च्या दिवशी ठरल्याप्रमाणे संबंधीतास दिनांक 15 जानेवारी 2007 पर्यंत Consortium Agreement सादर करण्यास पुन:श्च अवधी देण्यात आला. तथापी संबंधीताने वाढीव अवधीत देखील पुर्तता केली नाही. सबब एकमेव परिपुर्ण निविदा सादर केलेले C.M.C. Limited,

Mumbai यांची व्यापारी निविदा दिनांक 25 जानेवारी 2007 रोजी उघडण्यात आली असता त्यांनी रूपये 3,10,69,656/- (रूपये तीन कोटी दहा लक्ष एकोणसत्तर हजार सहाशे छप्पन्न मात्र) दर भरल्याचे दिसले.

संबंधीत निविदाधारकां समवेत दोन वेळा वाटाघाटी करून दर कमी करण्याबाबत सुचित केले असता यशस्वी वाटाघाटी अंती संबंधीताने त्यांचे सुधारीत देकारानुसार रूपये 2,00,00,000/- (रूपये दोन कोटी मात्र) असे दर सादर केले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| **Part - A : Pre-Implementation cost.** | | |
|---|---|---|
| 1. | Cost of ERP pakage :- No. license of 61 (Including two years AMC) | Rs. 91,00,000/- |
| 2. | Cost of Implementation for finance and Account (L.S.) | Rs.1,09,00,000/- |
| 3. | Cost of Implementation for HR (L.S.) | |
| 4. | Cost of Implementation for real estate management system (L.S.) | |
| 5. | Cost of Implementation for project system management (L.S.) | |
| 6. | Cost of creating of all master files required for all modules (L.S.) | |
| 7. | Data collection (if required) Person day | Rs.3000/- per person day |
| 8. | Training of 150 user staff (L.S.) | Included |
| | Price includes VAT and product AMC for 2 years (Product AMC will start from the date of soft ware {Product License} delivery) | |
| | Total .. | Rs.2,00,00,000/- |

**Note :- Service tax is extra as applicable at the time of billing.**

| **Part - B : Post-Implementation cost.** | | |
|---|---|---|
| 1. | Product annual maintenance charges(including upgrades) (L.S.for each year) | Rs. 7,82,000/- |
| 2. | Support for one year after go-live assuming 40 users at head office and 20 users at ward. (tow people) | Rs. 22,00,000/- |
| 3. | 1st year support (three people) | Rs. 32,00,000/- |
| 4. | 2nd year support- 5th year support (one person) | Rs. 48,00,000/- |

**Taxes are extra as applicable.**

**Note:-**

1. Price quoted above in part A are exclusive of service tax and same shall be charged extra as applicable. The price quoted part B are exclusive of all taxes and same shall be charged extra as applicable. All new taxes levied after submission of the proposal will reimbursed after the necessary documentary eveidence is submitted.
2. AMC will provide RDBMS recommended by CMC Ltd.
3. Aurangabad Municipal Corporation will sign end user License Agreement with SAP.
4. Payment terms:- Product license cost payment to be made against delivery of product licenses and implementation payment schedule will be discussed with Aurangabad Municipal Corporation as at the time of Agreement and mutually agreed terms is acceptable.
5. Delivery Period:- We agree to Aurangabad Municipal Corporations delivery period as mentioned in the tender.

तसेच उपरोक्त प्रमाणे Product Licenses ची 100% रक्कम संबंधीताने Against Delivery अपेक्षीलेली आहे. तथापी Product Licenses ची 50% रक्कम Against Delivery संबंधीतास देऊ करण्यास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे. तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या कारभारात गती व अधिक सुसूत्रता आणण्यासाठी तसेच नागरिकांना तत्पर सेवा देण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेत ERP Solutions (Enterprise Resource Planning base Solutions) योजना अंमलात आणण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी, परिपुर्ण निविदा सादर केलेले C.M.C. Limited, Mumbai यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचे सुधारीत देकारानुसार रूपये 2,00,00,000/- (रूपये दोन कोटी मात्र) या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.303 :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बी.ओ.एल.टी. तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पासाठी बी.ओ.एल.टी. समितीची, ज्योतीनगर येथे स्वीमींग पुल बांधणेसाठी निविदा कार्यवाहीचे निर्देश प्राप्त आहेत.

सदर न.भु.क्र.16261 ही महानगरपालिकेच्या मंजुरी ही महानगरपालिकेच्या मंजुर रेखांकन ज्योतीनगर येथील खुल्या जागेतील एकुण क्षेत्र 4229.50 चौ.मी. पैकी 50 टक्के जागा म्हणजे 2114.75 चौ.मी. क्षेत्रामध्ये स्वीमींगपुल बांधण्यासाठी व बांधीव क्षेत्र 422.95 चौ.मी. विकासक यांना 99 वर्षाच्या भाडेतत्वावर देणेसाठी निविदा काढणेसाठी निर्देश असून बोल्ट तत्वावरील प्रकल्पासाठी जाहीर निविदा सूचना दिनांक 28-12-2006 रोजी राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. दिनांक 29-1-2007 रोजी निविदापूर्व बैठक मा.आयुक्त यांचे दालनात घेण्यात आली. निविदा स्विकृतीची शेवटची तारीख दिनांक 3-2-2007 होती.

निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांका पर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

1. मे. शलाका इंजिनियर्स
2. मे. राठी कन्स्ट्रक्शन कंपनी

निविदा तीन लिफाफा पध्दतीनुसार मागविण्यात आल्या असून प्राप्त निविदांची निविदा प्रक्रिया पध्दतीनुसार लिफाफा प्रकार 1 व 2 ची छाननी करण्यात आली व पात्रता निकष पूर्ण होणाऱ्या दोन्ही निविदांचे लिफाफा क्रमांक 3 उघडण्यात आले, त्यांचे दर पुढे नमुद प्रमाणे आहेत.

1. मे. शलाका इंजिनियर्स — प्रिमियम रू.1,75,000/-
2. मे. राठी कन्स्ट्रक्शन कंपनी — प्रिमियम रू. 25,000/-

उपरोक्त प्रमाणे प्राप्त देकार दरापैकी मे. शलाका इंजिनियर्स यांचा दर तुलनात्मकदृष्ट्या उच्चतम प्राप्त आहे. सदर प्रकल्पाचे भुखंड क्षेत्र 4229.5 चौ.मी. असून 50 टक्के क्षेत्र म्हणजे 2114.75 चौ.मी. क्षेत्रामध्ये स्वीमींग पुल बांधणे व बांधीव क्षेत्र 422.95 चौ.मी. विकासक यांना 99 वर्षे भाडे तत्वावर द्यावयाचे आहे. सदर बांधीव क्षेत्रासाठी 99 वर्षासाठी भाडेपट्टा दर रू.5/- प्रति चौ.मी. प्रति महा या प्रमाणे राहणार आहे.

वाटाघाटीअंती मा.आयुक्तांनी विकासक यांना प्रिमियम ऑफर वाढविणे बद्दल सुचविले असता विकासक यांनी प्रिमियम रू.4,00,000/- महानगरपालिकेस देण्याबद्दल निविदेतील इतर अटी व शर्ती सह संमती दर्शविली आहे.

सदर प्रकल्पामुळे मिळणाऱ्या प्रिमियम चा वापर याच रेखांकनामधील खुल्या जागेच्या विकासासाठी करण्यात येईल.

तरी वरील प्रमाणे मे. शलाका इंजिनियर्स यांचे देकार दर रू.4,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे. शलाका इंजिनियर्स यांची सदर बोल्ट प्रकल्पासाठीची निविदा व 99 वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या करारावर प्रकल्प विकसीत करणेसाठी निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मंजुर रेखांकन ज्योतीनगर येथील खुल्या जागेतील एकुण क्षेत्र 4229.50 चौ.मी. पैकी 50 टक्के जागा म्हणजे 2114.75 चौ.मी. क्षेत्रामध्ये स्वीमींगपुल बांधणेच्या कामासाठी मे. शलाका इंजिनियर्स यांचे देकार दर रू.4,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे. शलाका इंजिनियर्स यांची सदर बोल्ट प्रकल्पासाठीची निविदा व 99 वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या करारावर प्रकल्प विकसीत करणेसाठी निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.304 :**

संचालक, प्राणी संग्रहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, सन 2007-2008 (1/4/2007 ते 31/3/2008) या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकरीता बिफ(खन्नी) खरेदी करणे करीता निविदा मागविण्यात आले असता एकूण 20 कोऱ्या निविदांची विक्री झाली असून त्यापैकी दर भरलेल्या 6 निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | भाव प्रति किलो |
|---|---|---|
| 1. | श्री. शेख अयाज शे. अब्दुल रहीम | रू. 40-30 |
| 2. | श्री. मोहम्मद सलीम मो.हनीफ कुरैशी | रू.41-65 |
| 3. | श्री. गफुर मिया कुरैशी | रू.43-40 |
| 4. | श्री. फेरोज खान रहेमान खान | रू.44-45 |
| 5. | श्री. शेख मुसा अब्दुल करीम | रू.46-25 |
| 6. | श्री. अब्दुल करीम अब्दुल रहीम | रू.47-50 |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर श्री. शेख अयाज शेख अब्दुल रहीम यांचे दर रू.40-30 प्रति किलो असून संबंधीताशी मा.आयुक्त यांचे सोबत झालेल्या चर्चेनंतर त्यांनी रू.40-30 प्रति किलो हे दर कमी करून रू.33-00 प्रति किलो, या दराने पुरवठा करण्याची तयारी दर्शविली आहे. या दरास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-2008 (1/4/2007 ते 31/3/2008) या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकरीता बिफ(खन्नी) खरेदी करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार, श्री. शेख अयाज शेख अब्दुल रहीम रक्कम रू.33-00 प्रति किलो या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.305 :**

उप आयुक्त(प्र) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन 2007-08 वर्षाकरीता औरंगाबाद मनपा क्षेत्रातील **क्रुएल्टी टू ॲनिमल ॲक्ट 1960 चे नियम द ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्ज) रूल्स 2001** अन्वये मोकाट कुत्र्यांची उत्पत्ती थांबविणे, संख्या मर्यादित ठेवणे करीता कुत्र्यावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे, त्याची औषधोपचार व देखभाल करणे, रेबिज प्रतिबंधक लस टोचणे या करीता निविदा मागविण्यात आले असता एकूण तीन कोरी निविदा विक्री झाली असून तीन भरलेले निविदा प्राप्त झाले आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | देण्यात आलेले दर | |
|---|---|---|---|
| | | प्रति नर श्वान | प्रति मादी श्वान |
| 1 | सावित्रीबाई बहुउद्देशीय बेरोजगारांची संस्था, धुळे | रू. 895/- | रू. 948/- |
| 2 | जय महर्षी वाल्मीक स्वयंरोजगार संस्था, देवपुर, धुळे | रू. 860/- | रु. 916/- |
| 3 | सचिव, महाराष्ट्र स्टेट कृषी व पशु वैद्यकीय तांत्रिक | रू. 651/- | रू. 701/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | कुशल सेवा संस्था, पुणे | | |

तुलनात्मकदृष्ट्या सचिव, महाराष्ट्र स्टेट कृषी व पशु वैद्यकीय तांत्रिक कुशल सेवा संस्था, पुणे यांचे दर प्रति नर श्वान रू.651/- आणि मादी श्वान रू.701/- हे सर्वात कमी असून निविदा धारक यांचे मा.आयुक्त यांचे बरोबर झालेल्या चर्चेनुसार त्यांनी वरील दर्शविलेले दर कमी करून प्रति नर श्वान रू.600/- आणि प्रति मादी श्वान रू.650/- हे दर शस्त्रक्रियेसाठी मान्य केले आहेत. या दरास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-08 वर्षाकरीता औरंगाबाद मनपा क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांची उत्पत्ती थांबविणे, संख्या मर्यादित ठेवणे करीता कुत्र्यावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे, त्याची औषधोपचार व देखभाल करणे, रेबिज प्रतिबंधक लस टोचणे या करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक, सचिव, महाराष्ट्र स्टेट कृषी व पशु वैद्यकीय तांत्रिक कुशल सेवा संस्था, पुणे यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे शस्त्रक्रियेसाठी प्रति नर श्वान रू.600/- आणि प्रति मादी श्वान रू.650/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.306 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, स्थायी समिती सभा दि.22/9/2006 ठराव क्र.114 प्रमाणे इतर अधिकाऱ्यांकरीता डिझेल इंडिका कार (DLX-TC) वाहने खरेदी करण्याचे प्रस्तावित करीत आहेत. उप आयुक्त(प्रशासन), उप आयुक्त(महसुल), मुख्य लेखाधिकारी व नगर सचिव यांचे वापरातील मारूती-800 कार जुन्या झाल्या असून सदरील वाहने लिलाव करण्यासाठी मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. त्यामुळे एकूण 4 नवीन कार खरेदी कराव्या लागणार आहेत. शहरातील टाटा मोटर्सचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स प्रा.लि., औरंगाबाद यांचेकडून प्राप्त दरपत्रकानुसार डिझेल इंडिका कार (DLX-TC) ची किंमत खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| वाहनाची शो रूम किंमत ....... | रू. 4,00,308/- |
| जकात कर ....... | रू. 6,005/- |
| एकूण किंमत ....... | रू. 4,06,313/- |

वरील प्रमाणे चार वाहनांची एकूण किंमत रूपये 16,25,252/- सदरील वाहन खरेदीचा खर्च अर्थसंकल्प 2006-07 मध्ये असलेल्या घसारा निधीच्या तरतुदीतून करण्याचे प्रस्तावित केले आहे.

करीता उप आयुक्त(प्रशासन), उप आयुक्त(महसुल), मुख्य लेखाधिकारी व नगर सचिव यांचे वापरातील वाहने जुनी झाल्यामुळे लिलाव करणे व त्यांचे वापरा करीता 4 डिझेल इंडिका कार (DLX-TC) मॉडेलची खरेदीसाठी येणारा खर्च रूपये 16,25,252/- व सदरील वाहने टाटा मोटार्सचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटार्स प्रा.लि., औरंगाबद यांचेकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उप आयुक्त(प्रशासन), उप आयुक्त(महसुल), मुख्य लेखाधिकारी व नगर सचिव यांचे वापरातील वाहने जुनी झाल्यामुळे लिलाव करणे व त्यांचे वापरा करीता 4 डिझेल इंडिका कार (DLX-TC) मॉडेलची, खरेदीसाठी येणारा खर्च रूपये 16,25,252/- व सदरील वाहने टाटा मोटार्सचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटार्स प्रा.लि., औरंगाबद यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.307 :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-11 नवजीवन कॉलनी, सिडको येथे 20 लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रूपये 50,36,920/- चे तयार केलेले असून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र.436 दिनांक 25-9-2006 अन्वये मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रातून निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम

तारखेपर्यंत एकूण 8 निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या नियोजित तारखेला एकूण 4 निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. मे.प्रिसीजन प्रेस फॅब्रीकॉन प्रा.लि. | - | 35.10% अं.प.दरापेक्षा जास्त. |
| 2. मे. रूद्राणी कन्स्ट्रक्शन | - | 39.90% अं.प.दरापेक्षा जास्त. |
| 3. मे. एस. डी. कन्स्ट्रक्शन | - | 46% अं.प.दरापेक्षा जास्त. |
| 4. मे. एल.के. कन्स्ट्रक्शन | - | 49.98% अं.प.दरापेक्षा जास्त. |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा मे.प्रिसीजन प्रेस फॅब्रीकॉन प्रा.लि. यांची असून निविदा रक्कमेच्या दरापेक्षा 35.10% जास्त दराची आहे. करीता या निविदा धारकास वाटाघाटीस बोलावून निविदेच्या रक्कमेनुसार 14.65% जास्त दराने काम करण्याचे संबंधीत गुत्तेदार यांनी वाटाघाटीअंती मान्य केले आहे. जे नवीन दरसुचीप्रमाणे (सन 2006-07) तुलना करता अं.प.दरापेक्षा 5.70% जास्त दराने होत आहे.

करीता संबंधीताची अं.प.दरापेक्षा (सन 2005-06) 14.65% जास्त दराने स्विकृतीचा प्रस्ताव स्थायी समित समोर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-11 नवजीवन कॉलनी, सिडको येथे 20 लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ बांधण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.प्रिसीजन प्रेस फॅब्रीकॉन प्रा.लि. यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा (सन 2005-06) 14.65% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.308 :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, ई-प्रशासनाचा भाग म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेतील नगर रचना विभागाकडून सुरू असलेल्या प्रचलित बांधकाम परवानगीमध्ये तत्परता येण्याच्या दृष्टीने बांधकाम परवानगीचे संगणकीकरण करून Auto DCR ही पध्दत बी.ओ.टी. तत्वावर कार्यान्वीत करण्याचे प्रस्तावित आहे.

औरंगाबाद शहरातील बांधकाम परवानगी नगररचना विभागाकडून सध्या तेथील अभियंत्यामार्फत छाननी करून देण्यात येते. संगणकीकरण Auto DCR द्वारे बांधकाम परवानगी 24 तासाचे आत नागरिकांना बांधकाम परवानगी प्राप्त होतील. सदर पध्दत बी.ओ.टी. तत्वावर पाच वर्ष मुदतीकरीता असल्याने यात औरंगाबाद महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारचा खर्च न करता खालील प्रमाणे राबविता येईल.

मान्यताप्राप्त वास्तुविशारदाकडून बांधकाम परवानगीचा प्रस्ताव हा सी.डी.(Soft Copy) मार्फत प्राप्त झाल्यानंतर Auto DCR च्या सॉफ्टवेअर द्वारे विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार छाननी केली जाईल. बी.ओ.टी. अभिकर्ता महानगरपालिकेकडून मान्य झालेले आवश्यक ते छाननी शुल्क घेऊन 24 तासाचे आत वास्तुविशारदाला Provisional Building Permission देण्यात येईल.

आज रोजी महानगरपालिकेमार्फत रूपये 0.20 प्रति चौ.फुट रहिवासीसाठी व रूपये 0.40 प्रति चौ.फुट अनिवासीसाठी छाननी शुल्क घेण्यात येते. परवानगी धारकास या ऐवजी रूपये 0.70 + Service Tax प्रति चौ. फुट रहिवासीसाठी व रूपये 0.90 + Service Tax प्रति चौ. फुट अनिवासीसाठी असे छाननी शुल्क भरावे लागेल. Provisional Building Permission बाबतची संपूर्ण जबाबदारी ही वास्तूविशारदाची राहील व मालकी हक्काबाबत स्वत: मालक जबाबदार राहील.

Provisional Building Permission घेतल्यानंतर विहीत कालावधीमध्ये वास्तूविशारदाने महानगरपालिकेकडून Plinth Complition Certificate घेणे बंधनकारक राहील व संपूर्ण कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर नगर रचना विभागाकडून अंतिम बांधकाम परवानगी देण्यात येईल.

Auto DCR बाबत निविदा मागविण्यात आली असता विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा विक्री झाल्यात व स्विकारण्याच्या अंतिम तारखेस एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदा बाबतचा तपशील खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **अभिकर्त्याचे नांव** | **प्राप्त दर प्रति चौरस फुट** |
|---|---|---|
| 1 | एस. एम. कम्प्युटर लि. | रू.1.50 पै. + टॅक्सेस एक्स्ट्रा |
| 2 | एम.एस.एस.आय.डी.सी.लि.औरंगाबाद | रू.0.99 पै. + सर्व्हीस टॅक्स पर स्क्वेअर फिट |
| 3 | ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि. | रू.1.20 पै. + सर्व्हीस टॅक्स एक्स्ट्रा |

वरील पैकी सर्वात कमी दर हे एम.एस.एस.आय.डी.सी.लि. औरंगाबाद यांचे प्राप्त झाले. दि. 9 मार्च 2007 रोजी प्रत्यक्ष दराबाबत वाटाघाटी झाल्या असता एम.एस.एस.आय.डी.सी.लि. औरंगाबादयांनी रू.0.50 + सर्व्हीस टॅक्स (अक्षरी पन्नास पैसे + सर्व्हीस टॅक्स) प्रति चौरस फुट प्रमाणे दर मान्य केलेला आहे.

वरील प्रमाणे बी.ओ.टी. तत्वावर पाच वर्ष मुदतीकरीता ऑटो डी.सी.आर. बाबतचे दर प्रति चौरस फुट 50 पैसे + सर्व्हीस टॅक्स (रूपये 0.50 + सर्व्हीस टॅक्स) असा असून प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील नगर रचना विभागाकडून सुरू असलेल्या प्रचलित बांधकाम परवानगीमध्ये तत्परता येण्याच्या दृष्टीने बांधकाम परवानगीचे संगणकीकरण करून Auto DCR ही पध्दत बी.ओ.टी. तत्वावर कार्यान्वीत करण्यासाठी प्राप्त निविदापैकी, बी.ओ.टी. तत्वावर पाच वर्ष मुदतीकरीता ऑटो डी.सी.आर. बाबतचे दर प्रति चौरस फुट 50 पैसे + सर्व्हीस टॅक्स (रूपये 0.50 + सर्व्हीस टॅक्स) या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.309 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गरवारे स्टेडीयम येथे जलतरण तलाव बांधणे करीता सा.बां. विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.250.00 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदरील अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.652/1 दि.11.1.2007 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/इ-निविदा/89/2007 दिनांक 18.1.2007 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 02 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1. मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | 32.33% जास्त दराने |
| 2. मे. ॲसेण्ड कन्स्ट्रक्शन | 42.90% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.33% जास्त दराची निविदा मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने संबंधीत गुत्तेदारास दिनांक 5.3.2007 रोजी मा.आयुक्त यांचे दालनात वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता मा.आयुक्तांनी अं.प.दरापेक्षा 32.33% जास्त दराऐवजी 15% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाच्या निविदे अंतर्गत खालील अटी व शर्ती नमुद केलेल्या आहेत.

1. सदरील प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सलग तीन वर्षापर्यंत त्यांची देखभाल दुरूस्ती व प्रकल्प सुस्थितीत स्वखर्चाने ठेवण्याची जबाबदारी संबंधीत निविदा धारकास बंधनकारक राहील. सदरील प्रकल्प तीन वर्षानंतर विना अट विना मोबदला महानगरपालिकेस सुस्थितीत हस्तांतरण करणे बंधनकारक राहील.
2. प्रकल्प 3 वर्ष देखभाल दुरूस्ती सह सुस्थितीत ठेवण्याकरीता मक्तेदारास/एजन्सीला येणारा खर्च भागविण्याकरीता विकसीत केलेल्या सर्व सोयी सुविधांचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांकडून

(महानगरपालिकेचा भाग सोडून) महानगरपालिकेतर्फे सिध्दार्थ जलतरण तलाव येथे जे शुल्क आकारण्यात येते त्यानुसार शुल्क आकारणी करून तसेच वार्षिक सदस्यत्व, मासिक सदस्यत्व, दैनिक शुल्काद्वारे वसुल करू शकेल.

3. निविदापुर्व बैठकीत ठरल्याप्रमाणे -

**अ)** महानगरपालिकेकडे पाणी उपलब्ध असल्यास व्यावसायिक दराप्रमाणे दर आकारून पाणी पुरवठा करण्यात येईल. अन्यथा निविदा धरकास स्वतःच्या जबाबदारीवर पाणी उपलब्ध करून घेणे बंधनकारक राहील. तसेच पाण्याचे नमुने नियमित केमिकल व फिजीकल ॲनालिसीस शासनाचे रिजनल लॅबोरेटरीमधून तपासणी करून घेणे बंधनकारक राहील.

**ब)** सदर प्रकल्प पुर्ण करणेसाठी व पुर्णत्वानंतर तीन वर्षाच्या कालावधीसाठी विद्युत पुरवठा व त्यासाठी लागणारा खर्च हा संबंधीत निविदा धारकास करणे बंधनकारक राहील.

**क)** आजीवन सभासद पोटी वसुल होणाऱ्या रक्कमे मधील काही प्रमाणातील रक्कम मक्तेदार स्वतः वापरू शकतो मात्र उर्वरीत रक्कम महानगरपालिकेच्या खात्यात अशा प्रकारे F.D.R. करावी की जेणे करून प्रकल्प महानगरपालिकेला हस्तांतरण करतेवेळी सदरील F.D.R. ची Matured रक्कम ही आजीवन सभासदाच्या पूर्ण रक्कमे इतकी महानगरपालिकेस प्राप्त होईल.

**ड)** सदरील प्रकल्पासाठी वापरण्यात येणारी गरवारे क्रिडा संकुल येथील महानगरपालिकेच्या मालकीची जागा मक्तेदारास कुठल्याही प्रकारच्या कारणासाठी Mortgage करता येणार नाही.

**इ)** मक्तेदारास प्रकल्पाच्या ठिकाणी तीन वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी अतिरिक्त सुविधा पुरवून त्या माध्यमातून शुल्क वसुली करावयाची असल्यास मा. आयुक्त यांची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

4. तसेच सौना व स्टीम बाथ, स्कॉश कोर्ट, आधुनिक जिम्नॅशियम करीता वेळोवेळी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार शुल्क आकारणी करू शकेल.

5. तसेच प्रकल्पा लगत अस्तित्वात असलेल्या दोन बॅडमिंटन कोर्टची लाकडी फ्लोरींग बदलुन आधुनिक पध्दतीचे फ्लोरींग असलेले बॅडमिंटन कोर्ट उभारण्यासाठी स्वतःची रक्कम रूपये 15.00 लक्ष इतका खर्च करावे लागेल. सदर खर्चाचा परतावा महानगरपालिका देणार नाही. सदर खर्च प्रति कोर्टसाठी प्रतिमहा प्रतितास रू.1000/- शुल्क आकारणी करून 3 वर्षाच्या कालावधी पर्यंत मक्तेदाराने/एजन्सी धारकाने वसुल करावा.

6. सदर प्रकल्प करीता नियुक्त मक्तेदार/एजन्सीला काम प्रगती पथावर असतांना प्रयेक दरम्यान देयकापैकी निव्वळ 77% देयक अदा करण्यात येईल. तसेच नियोजित काम पूर्ण झाल्यानंतर संबंधीताच्या देयकातून सुरक्षा ठेव म्हणून राखुन ठेवलेल्या 23% रक्कमेपैकी 5% रक्कम देयकाच्या 1 वर्षाच्या कालावधीनंतर, 6% रक्कम दोन वर्षाच्या कालावधी नंतर, 7% रक्कम 3 वर्षाच्या कालावधीनंतर व उर्वरीत 5% रक्कम प्रकल्प सुस्थितीत महानगरपालिकेस हस्तांतरण केल्याच्या 90 दिवसानंतर अदा करण्यात येईल.

7. प्रत्येक वर्षी सलग 7 दिवस महानगरपालिकेच्या स्पर्धासाठी विनामुल्य विना अट सोयी व सुविधासह जागा व जलतरण तलाव उपलब्ध करून द्यावे लागेल.

वरील सर्व अटी शर्तीचा समावेश करारनाम्यात करण्याच्या मान्यतेस्तव व एलोरा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 32.33% जास्त दराऐवजी 15% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गरवारे स्टेडीयम येथे जलतरण तलाव बांधणे करीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे. एलोरा कन्स्ट्रकशन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील कामासाठी प्रस्तावात नमूद अ.क्र.1 ते 7 च्या अटी व शर्तीस अधीन राहून मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 15% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.310 :** **( दि.16-1-2007 च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव-विषय क्र. 206)**

उप आयुक्त (महसूल) प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेचे मो.गुलमंडी येथील भोलेश्वर मार्केटचा पहिला मजला भाडेतत्वावर देणे बाबत खालील प्रमाणे मान्यता देणे आवश्यक आहे.

**मोहल्ला गुलमंडी(मनपा व्यापारी संकुल) भोलेश्वर मार्केटचा पहिला मजला :**

प्रस्तावित भोलेश्वर मार्केटचा पहिला मजल्याचे भाडे रू.75/- प्रति चौ.मी. प्रतिमाह व अनामत रक्कम रू.350/-प्रती चौ.मी. आकारण्यात यावे.

करीता वरील सर्व जागेकरीता जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो भाडेकरून भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल व सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रतिमाह भरावा लागेल. नेहमीच्या अटी शर्ती नुसार भाड्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे मो.गुलमंडी येथील भोलेश्वर मार्केटचा पहिला मजला भाडेतत्वावर देण्याकरीता भोलेश्वर मार्केटचा पहिला मजल्याचे भाडे रू.75/-प्रति चौ.मी. प्रतिमाह व अनामत रक्कम रू.350/-प्रती चौ.मी.आकारण्यास मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे व सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रतिमाह व नेहमीच्याअटी शर्ती नुसार भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.311 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीचौक येथील झाशीची राणी लक्ष्मीबाई उद्यानात विविध कामे करण्याकरीता सा.बां. विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रू.13,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षा अंतर्गत इतर कामे या लेखा शिर्षा अंतर्गत पान क्र.W-184 अ.क्र.1 या अंतर्गत करण्यात येईल.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 13,00,000/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक येथील झाशीची राणी लक्ष्मीबाई उद्यानात विविध कामे करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.312 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दत्तनगर विद्युत कॉलनी उद्यानाचे सौंदर्यीकरण करणे या कामासाठी सा.बां. विभागाच्या सन 2004-05 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूपये 1,96,760/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. तसेच याच प्रभागात विद्युत कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणे करीता अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 99,546/- या दोन्ही कामांसाठी एकच एजन्सी 1% कमी दराने काम करणारी आहे. या भागाचे स.नगरसेवक यांनी सुचित केल्यानुसार सदरील दोन्ही कामे एकत्र करून त्या ऐवजी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील बास्केटबॉल ग्राऊंडच्या डिझाईन नुसार खुल्या जागेत बास्केटबॉल ग्राऊंड तयार करणे करीता एकुण सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 2,99,000/- चे तयार करण्यात आले, त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील काम प्रगतीपथावर असून सदरील ठिकाणी संरक्षित भिंतीची उंची वाढविणे, भरती करणे, रंगकाम करणे इत्यादी कामे करण्यास्तव स.नगरसेवक यांनी मागणी केलेली आहे. त्यानुसार सदरील कामाचे वाढीव कामास्तव रक्कम रूपये 2,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यानुसार 2,99,000/- + 2,00,000/- = रूपये 4,99,000/- चे अंदाजपत्रकास व सदरील काम मुळ गुत्तेदार श्री.शेख मुर्तूझा शेख युसूफ यांचेकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1% कमी दराने करून घेण्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामाचे वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 2,00,000/- चे काम मुळ गुत्तेदार श्री.शेख मुर्तुझा शेख युसुफ यांचेकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दत्तनगर विद्युत कॉलनी उद्यानाचे सौंदर्यीकरण करणे या कामामध्ये वाढ झाल्याने ठिकाणी संरक्षित भिंतीची उंची वाढविणे, भरती करणे, रंगकाम करणे इत्यादी कामे करण्यास्तव सदरील कामाचे वाढीव कामास्तव रक्कम रूपये 2,00,000/- ची वाढ होत असल्यामुळे मूळ रक्कम रू.2,99,000/- + वाढीव रक्कम रू.2,00,000/- = असे एकूणरूपये 4,99,000/- चे एकत्रित अंदाजपत्रकास व सदरील काम मुळ गुत्तेदार श्री.शेख मुर्तूझा शेख युसूफ यांचेकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.313 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, दिल्ली गेटच्या पश्चिमेकडील 18.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्यात बाधीत मिळकतीच्या क्षेत्राचे भूसंपादन करतांना तेथील सहा मिळकत धारकांना न.भू.क्र.7470, 7469, 7466, 7471, 7473/1 आणि 11451 मिळकती मधील बाधीत क्षेत्राच्या मोबदला रक्कमे ऐवजी हिराखान रेखांकनातील महानगरपालिकेच्या मालकीच्या न.भू.क्र.18349/1/100 जमीनीतील भूखंड देण्यात आले होते. त्यानुसार जमीनी बाबत अदलाबदल खरेदीखत करून भूसंपादनासाठी प्रक्रीया पूर्ण करण्यात आली होती. खरेदी खता आधारे पी.आर.कार्डवर संबंधीतांच्या नांवाच्या नोंदी करण्यात आल्या होत्या. परंतु मा.न्यायालयाने हिराखान रेखांकनातील महानगरपालिकेच्या मालकीची जागा न.भू.क्र.18349/1/100 मधील संबंधीतांना देण्यात आलेल्या भूखंडासंबंधी मनाई हुकूम दिल्याने भूखंड धारकांना तेथे बांधकाम करता आले नाही. सबब दिल्लीगेटच्या वरील नमुद मिळकत धारकांनी 18 मीटर रूंद रस्त्यात बाधीत क्षेत्रा ऐवजी दिलेले भूखंड त्यांना मिळाले नसल्याने महानगरपालिकेतर्फे त्यांना दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील 18 मीटर रूंद (50 फुट रूंद) विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्राचा मोबदला खाजगी वाटाघाटीने देण्यासाठी सर्वसाधारण सभा दि.11-8-2006 मधील ठराव क्र.327 नुसार आवश्यक खर्चासह मान्यता मिळालेली आहे. सदरील मोबदला देण्यापुर्वी दिल्लीगेट येथील वरील सहा मिळकत धारकांना रितसर खरेदी खतानुसार हिराखान रेखांकनातील न.भू.क्र.18349/1/100 या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील दिलेले भूखंड खरेदीखत करून परत घेणे आवश्यक आहे. वरील भूखंड संबंधीतांना मिळाले नसल्याने त्यांना तेथे बांधकाम करता आले नाही. यात त्यांची चुक नसल्याने खरेदी खताचा खर्च महानगरपालिकेने करणेसाठी खरेदी खताचा अपेक्षित खर्च खालील प्रमाणे.

| अ.क्र. | न.भू.क्र. | भूखंड क्रमांक | भूखंडाचे क्षेत्र चौ.मी. | खरेदी खताचा सध्याच्या आर.आर. दराने येणारा अपेक्षित खर्च रूपये |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 18349/1/100 पैकी | 30 व 31 | 173.00 | 52,400.00 |
| 2 | 18349/1/100 पैकी | 1 | 106.00 | 32,300.00 |
| 3 | 18349/1/100 पैकी | 3 | 47.25 | 14,720.00 |
| 4 | 18349/1/100 पैकी | 4, 5 व 6 | 141.75 | 43,040.00 |
| 5 | 18349/1/100 पैकी | 29 | 95.00 | 29,000.00 |
| 6 | 18349/1/100 पैकी | 2 | 47.25 | 14,720.00 |
| | | | एकूण रक्कम | 1,85,880/- |

वरील प्रमाणे खरेदी खतासाठी येणारा एकुण खर्च रूपये 1,85,880/- (एक लक्ष पंचाऐंशी हजार आठशे ऐंशी फक्त) ला मा.स्थायी समितीने ठराव क्रमांक 271 दिनांक 27-2-2007 नुसार मान्यता दिलेली आहे.

दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील 18.00 मीटर रूंद रस्त्यात बाधीत क्षेत्राचा सन 2006 चे शिघ्र सिध्द गणकाचे दरात आवश्यक ती वजावट करून गणना करण्यात आलेला रोख स्वरूपात येणारा मोबदला खालील प्रमाणे.

| अ.क्र. | न. भू.क्र. | बाधीत क्षेत्र / चौ.मी. | मोबदला रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| 1 | 7466 | 36.00 | 1,44,000/- |
| 2 | 4769 | 87.20 | 3,48,832/- |
| 3 | 7470 | 161.60 | 6,53,400/- |
| 4 | 7471 | 124.90 | 4,99,600/- |
| 5 | 7473/1 | 75.00 | 3,00,000/- |
| 6 | 11451 | 40.70 | 1,62,800/- |
| | | एकूण रूपये... | **21,08,632/-** |

प्रकरणात मोबदला रक्कम रूपये 21,08,632/- (एकवीस लाख आठ हजार सहाशे बत्तीस रूपये फक्त) संबंधीतांना अदा करण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

डॉ. आशा बिनवडे : टीडीआर देता येईल या बाबत आयुक्तांनी विचारविनिमय करून कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : हा प्रकरण वेगळे आहे . दिल्ली गेट येथील लोकांना जगा देण्याचे मान्य केले होते.रजिस्टेशन पण झाले होते. ती जगा सोसायटीला विशिष्ट एका कामासाठी दिली होती.म्हणून सदर लोकांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले व मा. न्यायालयाने असे आदेशीत केले की तेथे दुसरे कोणतेही काम करता येणार नाही. म्हणून जी जगा दिली होती ती जगा परत करावी व पैसे घ्यावे म्हणून ज्यांचेकडून जगा घेतो ती त्यांची पसंती असते की टीडीआर घेणार की रक्कम किंवा एफएसआय घेणार.

मा. सभापती : या प्रस्तावात अ.क्र २ मध्ये ७४६९ असे वाचावे या दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.संबधीत लोकांना मा.आयुक्तांनी बोलवून घ्यावे त्यांना टीडीआर घेत असतील तर ते तपासून पहावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्ली गेटच्या पश्चिमेकडील 18.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्यात बाधीत मिळकतीच्या क्षेत्राचे भूसंपादन करतांना तेथील सहा मिळकत धारकांना न.भू.क्र.7470, 7469, 7466, 7471, 7473/1 आणि 11451 मिळकती मधील बाधीत क्षेत्राच्या मोबदला रक्कमे ऐवजी हिराखान

रेखांकनातील महानगरपालिकेच्या मालकीच्या न.भू.क्र.18349/1/100 जमीनीतील भूखंड देण्याच्या संदर्भात मा.न्यायालयाचे निर्णयानुसार दिल्लीगेटच्या वरील नमुद मिळकत धारकांनी 18 मीटर रूंद रस्त्यात बाधीत क्षेत्रा ऐवजी दिलेले भूखंड त्यांना मिळाले नसल्याने महानगरपालिकेतर्फे त्यांना दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील 18 मीटर रूंद (50 फुट रूंद) विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्रसाठी अ.क्र.1 ते 6 मध्ये दर्शविल्यानुसार मोबदला रक्कम रूपये 21,08,632/- (एकवीस लाख आठ हजार सहाशे बत्तीस रूपये फक्त) संबंधीतांना अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संबंधीत भूखंडधारक टीडीआर घेत असतील तर ते तपासून पहावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 314 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, औरंगाबाद यांना रूग्णालयातील साहित्य (फाऊलर बेड, सेमी फाऊलर बेड) पुरविणे बाबत स्थायी समिती ठराव क्र.56 नुसार पारित केला असून साहित्य खरेदी निविदेद्वारे करण्यास मंजुरी दिली. तद्नुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करून दिनांक 27-9-2006 रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या. दिनांक 19-10-2006 रोजी निविदा पेटी उघडली असता फाऊलर बेड करीता 5 (पाच) व सेमी फाऊलर बेड करीता 5 (पाच) निविदा प्राप्त झाल्या.

| **फाऊलर बेड (संख्या - 75 नग)**<br>प्राप्त निविदाधारक | **सेमीफाऊलर बेड (संख्या - 300 नग)**<br>प्राप्त निविदाधारक |
|---|---|
| 1. एम.एस.एस.आय.डी.सी. | 1. एम.एस.एस.आय.डी.सी. |
| 1. पूर्वा सर्जिकल्स, औरंगाबाद | 2. पूर्वा सर्जिकल्स, औरंगाबाद |
| 2. मेट्रो मेटल इंडस्ट्रिज, औरंगाबाद | 3. मेट्रो मेटल इंडस्ट्रिज, औरंगाबाद |
| 3. निविदा पाकीटावर नाव नाही. | 4. निविदा पाकीटावर नाव नाही. |
| 4. जनक हेल्थ केअर | 5. जनक हेल्थ केअर |

उपरोक्त प्राप्त निविदांपैकी तांत्रिक लिफाफ्यानुसार पात्र ठरलेल्या **एम.एस.एस.आय.डी.सी.** च्या निविदेचा दुसरा लिफाफा (Commercial Bid) दिनांक 8-3-2007 रोजी उघडण्यात आला असता **फाऊलर बेड** करिता रूपये **6651.00** (सहा हजार सहाशे एक्कावन्न रूपये) प्रति नग व **सेमी फाऊलर बेड** करिता रूपये **5004.00** (पाच हजार चार रूपये) प्रति नग असे दर प्राप्त आहे.

प्राप्तदरास मंजुरी देणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, औरंगाबाद यांना रूग्णालयातील साहित्य (फाऊलर बेड, सेमी फाऊलर बेड) पुरविणे बाबत स्थायी समिती ठराव क्र.56 नुसार पारित ठरावाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या निविदापैकी पात्र निविदाधारक **एम.एस.एस.आय.डी.सी.** यांचे **फाऊलर बेड** करिता रूपये **6651.00** (सहा हजार सहाशे एक्कावन्न रूपये) प्रति नग व **सेमी फाऊलर बेड** करिता रूपये **5004.00** (पाच हजार चार रूपये) प्रति नग या दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 315 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबा प्रस्ताव सादर करीत आहे की, रेल्वेस्टेशन गेस्ट हाऊस येथील मोकळ्या मैदानात असलेले भंगार साहित्याची निविदा/बोली पध्दतीने दिनांक 27/3/2007 रोजी श्री.मिर्झा कलीम बेग यांची बोली रक्कम रू.12.30 प्रती किलो प्रमाणे मंजुर करण्यात आली होती.

सदर जागेवर बी.ओ.टी. प्रकल्पाचे काम सुरू करणेसाठी सदर जागा बी.ओ.टी. एजन्सीस तात्काळ देणे असल्यामुळे गेल्या वर्षी दिलेल्या दराने तेच ठेकेदार श्री.मिर्झा कलीम बेग यांना त्याच दराने रू.12.30 प्रती किलो दराने देणे बाबत मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. सदरील भंगार साहित्याची विक्री करतांना संबंधीत ठेकेदाराकडून प्रथमतः अनामत रक्कम रू.15000/- घेण्यात येईल व त्यानुसार प्रत्येक भंगाराचे

वजन केल्यानंतर रक्कमेचा भरणा करून घेऊन भंगार साहित्य जागेवरून हलविण्याची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे. करीता प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन गेस्ट हाऊस येथील मोकळया मैदानात असलेले भंगार साहित्याची निविदा/बोली पध्दतीने दिनांक 27/3/2007 रोजी श्री.मिर्झा कलीम बेग यांची बोली रक्कम रू.12.30 प्रती किलो या दराने भंगार विक्री करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 316 :**

श्री. भागाजी पाराजी सोनवणे, शाखा अभियंता(प्र.वॉर्ड अभियंता-अ), मनपा औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2007/322, दिनांक 6-3-2007 च्या त्यांचे निलंबन आदेशा विरूध्द सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून मान्यता दयावी.

मा. सभापती : मा. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून संबधीतास कामावर घेण्यात यावे.मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री. भागाजी पाराजी सोनवणे, शाखा अभियंता(प्र.वॉर्ड अभियंता-अ), मनपा औरंगाबाद यांनी त्यांचे निलंबन आदेशाविरूध्द सादर केलेले अपील मान्य करण्यात येऊन कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2007/322, दिनांक 6-3-2007 रद्द करण्यास मा.न्यायालयाचे निर्णयाचे अधीन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्यांना त्वरीत कामावर रूजू करून घेण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 317 :**

**विषयः- औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे विविध ठिकाणी असलेले सांस्कृतिक सभागृह, समाज मंदीर, अभ्यासिका केंद्र, व्यायामशाळा व शाळा भाडेतत्वावर देणे बाबत.**

**प्रस्तावाचे निवेदन :-**

दिनांक 18-2-1999 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत महानगरपालिकेचे वाचनालय, व्यायामशाळा, सांस्कृतिक हॉल, क्रिडा संकुल, मंगल कार्यालय इत्यादी इमारती भाडेतत्वावर देण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली होती. त्यानुसार विविध ठिकाणी असलेले हॉलचे भाडे सिध्द शीघ्र गणकानुसार आकारले जात होते. त्यानंतर भाडे समितीत भाडे ठरवुन व मा.स्थायी समितीची मान्यता घेऊन त्यानुसार वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देऊन निविदा मागविल्या जात असे. त्यामध्ये ज्यांची जास्त दराची निविदा असेल त्यांना सदरचे हॉल भाडे तत्वावर देण्यात येत असत.

या धोरणाने इमारती भाड्याने देण्याचा प्रयत्न केला असता जास्त भाडे होते म्हणून नागरीक/संस्था जागा घेण्यास नकार देतात. या परिस्थितीमुळे गेल्या कित्येक वर्षातमनपाचे बांधलेले हॉल वापरात येत नाहीत. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

दिनांक 16-1-2007 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती मध्ये सर्व हॉल नाममात्र मासिक भाडे रू.1000/- आकारणी करून देण्याचे धोरण ठरविण्यात आले. यामध्ये एक वर्षाचे आगाऊ भाडे, लाईट बील, देखभाल दुरूस्तीचा खर्च, नोंदणीकृत करारनामा करणे ऐवजी नोटरी करणे इत्यादी बाबींचा विचार करून त्यास मान्यता देण्यात आली. ह्यामुळे महानगरपालिकेच्या विविध इमारती वेगवेगळ्या क्षेत्रफळाच्या असल्यामुळे मोठे व छोटे हॉल यांना एकच भाडे होईल. यामुळे समानता येणार नाही.

तरी ह्यास्तव दि.18-2-2006 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत कर आकारणीचे जे नविन धोरण ठरविण्यात आले आहे त्याचा वापर विविध ठिकाणचे असेलेले हॉल देण्याकरीता करता येईल. म्ळणजे सदर ठरावात बाब क्र.1 नुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकर्तींसाठी चार विभाग प्रस्तावित केलेले आहेत. त्याऐवजी खालील नमुद केल्याप्रमाणे विभागासाठी सिध्द शीघ्र गणकातील दरानुसार **अ, ब, क** व **ड** असे चार भाग करण्यात येतात. त्या-त्या विभागासाठी सिध्द शीघ्र गणकाचा वापर करून **अ, ब, क** व **ड** असे चार भागानुसार भाडे ठरविता येईल.

| अ.क्र. | विभाग | जागांची किंमत प्रती चौ.मी. |
|---|---|---|
| 1 | अ | रू.11000/-पेक्षा जास्त |
| 2 | ब | रू.9500/- ते 10999/- |
| 3 | क | रू.8000/- ते 9499/- |
| 4 | ड | रू.7999/- पेक्षा कमी. |

तरी वरील तिन्ही ठरावांचा सखोल विचार करून व महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने तसेच आतापर्यंत रिकामे अवस्थेत असलेले हॉल भाडेतत्वावर देण्याच्या दृष्टीने प्रशासनातर्फे खालील प्रमाणे फेरधोरण ठरविणेस्तव फेर विचारार्थ प्रस्ताव सादर करत आहे.

**प्रशासनाचा प्रस्ताव** :-

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे विविध ठिकाणी असलेले सांस्कृतिक सभागृह, समाज मंदिर, अभ्यासिका केंद्र, व्यायामशाळा भाडे तत्वावर देणेसाठी सिध्द शीघ्र गणकाचे दर हे शासनाने खरेदी विक्री व्यवहारासाठी ठरविलेले आहेत. इमारतीचे क्षेत्रफळानुसार वाजवी भाडे किती असावे हे ठरविण्यासाठी प्रति चौ.मी./प्रती माह भाडे किती असावे हे ठरविणे आवश्यक आहे. मनपा कर आकारणीसाठी जे भाडे दर आकारते त्यातील खुल्या जागेचे भाडे दर व इमारत भाडे दर प्रती चौ.मी. प्रती माह आहेत, त्याचा वापर महानगरपालिकेच्या इमारती व जागा भाड्याने देणेस्तव केल्यास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.196/1 दि.18-2-2006 नुसार वाजवी भाडे आकारणीस्तव ठरविलेल्या बाब क्र.3 चे दरानुसार इमारती भाडे व बाब क्र.4 चे दरानुसार खुली जागा यांची भाडे निश्चिती करून किमान एकदा तरी सदर इमारतीची जाहीर बोली करण्यात येईल. त्यास प्रतिसाद न मिळाल्यास सदर इमारतीसाठी जे प्रथम अर्ज करतील व ज्यांना खालील सर्व अटी मान्य असतील त्यांना खालील अटी शर्तीवर भाड्याने देणे योग्य होईल.

बाब क्र.3 :- इमारतीचा वाजवी भाड्याचा दर प्रती चौ.मी. प्रती माह खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| 01 | आर.सी.सी. | रू. 24/- | रू. 22/- | रू. 21/- | रू. 20/- |

बाब क्र.4 :- मोकळ्या जागांचे वाजवी भाड्याचे दर प्रती चौ.मी. प्रती माह खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| 01 | केवळ मोकळ्या जागा | रू. 1.20 | रू.1.00 | रू. 0.80 | रू. 0.20 |

अटी शर्ती :-

1. सदर इमारत/जागा केवळ पाच वर्षासाठी भाड्याने देय होईल.
2. संस्था प्रमुखांनी मा.आयुक्तांच्या नांवे अर्ज केलेला असावा. अर्जामध्ये संदर्भिय इमारत कोणत्या कारणासाठी वापरली जाणार आहे व इमारतीचा वापर ज्या लाभार्थीसाठी होणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख असावा.

3. संदर्भिय इमारत/जागा ज्या वापरासाठी दिली असेल त्याच वापरासाठी अनुज्ञेय राहील. दुसरा वापर आढळल्यास विना सूचना करारनामा रद्द करण्यात येईल व सदरील इमारत महानगरपालिका ताब्यात घेईल. याचे अधिकार मा.आयुक्तांना राहतील.
4. इमारतीचा दुरूपयोग होत असल्याचे आढळुन आल्यास संस्था प्रमुखांविरूध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येऊन इमारत महानगरपालिकेच्यात ताब्यात घेण्यात येईल.
5. इमारत वापरातील पाच वर्षाच्या काळात केव्हाही अर्जात नमुद केल्याप्रमाणे योग्य रितीने कामकाज/वापर होत नसेल तर महानगरपालिका ही इमारत मुदतीपुर्व संस्थेकडून काढून घेईल.
6. सामाजिक कार्यासाठीच संदर्भिय इमारतीचा वापर करता येईल.
7. वापराच्या काळात इमारतीस काही नुकसान झाल्यास संबंधीत संस्थेस जबाबदार धरण्यात येईल. तसेच इमारत आणि इमारतीचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
8. सदर इमारत कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस पोट भाडेकरू म्हणून अथवा काही तासांसाठी म्हणुन भाड्याने देता येणार नाही. केवळ सदर संस्थेच्या व कॉलनीतील जनतेच्या वापरास्तव अनेज्ञेय असेल.
9. ज्या कॉलनीत ती इमारत/जागा असेल त्या कॉलनीच्या किमान 2/3 भूखंड धारकांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील. हरकत घेतल्यास हॉलदेय करता येणार नाही. अशा वेळी मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना जाहीर बोली करून लिलाव करण्याचा अधिकार राहील.
10. ज्या संस्थेस इमारत/जागा भाड्याने घ्यावयाची असेल ती संस्था धर्मादाय आयुक्त किंवा सहकार निबंधक मार्फत पंजीकृत असणे आवश्यक आहे.
11. ह्या इमारती भाड्याने देतांना करारनामा हा नोंदणीकृत करावा लागेल.
12. एक वर्षाचे आगाऊ भाडे मनपाकडे भरावे लागेल व जी संस्था वर्षाचे भाडे एक रकमी एप्रिल महिन्यात भरणा करेल त्यांना 10% सूट देण्यात येईल. थकबाकीवर दरसाल दर शेकडा 18% व्याज आकारले जाईल.
13. सेवा शुल्क रू.5/- प्रति चौ.मी. प्रती माह आकारण्यात येईल.
14. मालमत्ता कर संबंधीत संस्थेला भरावा लागेल. देखभालीच्या काळात विद्युत बील व पाण्याचे बील संदर्भिय संस्थेस भरावे लागेल. त्यात सोबत रंगरंगोटी, किरकोळ दुरूस्तीसाठी महानगरपालिकेची परवानगी घेऊन करता येईल.

वरील प्रमाणे अटी शर्ती नुसार इमारती / जागा भाडेतत्वावर दिल्यास सर्व जनतेस परवडण्यासारखे होईल व महानगरपालिकेस उत्पन्न तसेच इमारतींची देखभाल, दुरूस्ती विना खर्च होईल.

करीता अशा वेळी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य अशा प्रकारे जागा/इमारत देय करता येईल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. सभापती : हॉल भाडयाने देण्यासाठी दर ठरविण्या बाबतचा प्रस्ताव आहे.

श्री. विनायक पांडे : एकदा हॉलचे दर ठरविलेले होते. शहरात अनेक हॉल रिकामे पडलेले असून त्याचे दार खिडक्या लोकांनी काढून घेवून गेलेले आहे. कमीत कमी दराने देण्याचा निर्णय घेण्यात यावा.

मा. आयुक्त : सभागृहाने एक ठराव केला होता, डायरेक्शन दिले होते सरसकट एक हजर रूपये भाडे आकारावे. परंतू सर्वच हॉल सारख्या आकाराचे नाहीत. लहान मोठे आकाराचे आहे. तसेच कोणत्या भागासाठी किती भाडे असावे ते निश्चीत करावे लागेल. नेट रेटेबल व्हॅल्यू प्रमाणे आकारणी करावी. सरसकट देता येणार नाही.

श्री. विनायक पांडे : हे सत्य असले तरी आजच्या परीस्थितीत कोणतीही सामाज्क्ि संस्था जस्तीचे भाडे देवून घेण्यास कुणीही तयार नाही. अनेक वर्षापासून हे हॉल रिकामे पडलेले आहे.

मा. आयुक्त : ऑक्शन काढले होते. तेवढे मार्केट नसल्यामूळे कुणी घेतले नाही. जर चांगली संस्था घेण्यास तयार असेल तर जे नेट रेटेबल व्हॅल्यू आहे त्यानुसार देण्यात यावे. काही हॉल ५००, तर काही १००० क्वेअर फुटचे आहे. तर वर्षाचे भाडे किती येते, त्याचा विचार करावा.

श्री. त्र्यंबक तुपे : वर्षाचे किती भाडे येईल. वर्षानुवर्षपासून हॉल तसेच पडून आहेत.

श्री.विनायक पांडे : कितीतरी हॉल रिकामे पडलेले आहेत.

मा. आयुक्त : त्यासाठी, यापुढे नवीन हॉल बांधू नये असे धोरण असावे.

मा. सभापती : १००० क्वेअर फुटच्या हॉलसाठी प्रशासनाने ठेवलेल्या दरानुसार वर्षभरासाठी किती रक्कम येते. खूलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : १००० क्वेअर फुटच्या हॉलसाठी प्रति महिना रू. २२३१ /-इतके भाडे पडते.

डॉ. आशा बिनवडे : मागिल बैठकीत सुध्दा या विषयावर चर्चा झालेली होती. हॉलचे उत्पन्न यावे म्हणून अशी अपेक्षा ठेवू नये. सामाजिक सेवेसाठी हे हॉल असतात. माझ्या वार्डात १०-१२ वर्षापासून भाजी मंडईचे गाळे बांधलेले आहेत. कमर्शियल वापर करू शकलो नाही. अशा पध्दतीने धोरण असल्यामुळे तो खर्च वाया गेलेला आहे. ऑक्शन केले परंतू कुणीही घेण्यास तयार नाही.

मा. सभापती : मागिल स्थायी समितीमध्ये दिलेल्या रूलींग प्रमाणे १०००/-रू. हॉलचे प्रतिमहा भाडे आकारणी करावी. त्या हॉलचा देखभाल दुरूस्तीचा खर्च हा संबधीत व्यक्ती किंवा संस्थेकडे असेल.

मा. आयुक्त : काही हॉल लहान आहे, ५०० क्वे. फुटचे आहे. त्यासाठी ११००/-रू. भाडे येईल.

मा. सभापती : महानगरपालिकेकडे १००० क्वे. फुटचे हॉल आहे. १०००/-रू. भाडे प्रतिमहा भाडे आकारणी करावी व देखभाल दुरूस्तीचा खर्च संबधीत व्यक्ती किंवा संस्थेकडे राहील. अशा पध्दतीने भाडेने देण्यात यावे.

मा. आयुक्त : ऑडीट ऑब्जेक्शन येवू शकते म्हणून एक वेळ लिलाव पध्दतीने देण्याचा प्रयत्न करू तरीही गेले नाही, तर अशा पध्दतीने भाडेने देण्याची कार्यवाही करणे योग्य वाटते.

मा. सभापती : लिलाव करण्याची आवश्यकता नाही. अनेक वर्षापासून सदरील हॉल वापराविना पडून आहेत. म्हणून १०००/-रू. प्रतिमहा भाडे आकारणी करावी व देखभाल दुरूस्तीचा खर्च संबधीत व्यक्ती किंवा संस्थेकडे राहील. अशा पध्दतीने भाडेने देण्याची कार्यवाही करावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे विविध ठिकाणी असलेले सांस्कृतिक सभागृह, समाज मंदिर, अभ्यासिका केंद्र, व्यायामशाळा भाडे तत्वावर देणेसाठीच्या प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अनेक हॉल वापराविना पडून असल्यामुळे प्रतिमहा रू.1000/-(एक हजार रूपये) भाडे आकारून व सदरील हॉलच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च संबंधीत संस्थेने करावा अटीवर हॉल भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 318 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि., वि.इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, केंद्र शासनाच्या सौर संयंत्रे अस्थापीत करण्याच्या योजनेतून औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सोलार स्ट्रीट लाईट/गार्डन लाईट लावण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये 24,00,000/- चे अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.252/6 दि.20-7-2006 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार औरंगाबाद महानगरपाकिा क्षेत्रात सोलार स्ट्रीट लाईट/गार्डन लाईट लावण्याच्या कामाकरीता कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/96/2007 दिनांक 2-2-2007 अन्वये फेर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी दोन निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या. त्या दिनांक 21-2-2007 रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

1. मे. पर्ल एंटरप्रायजेस, पुणे - 8.958% जास्त दराने
2. मे. रश्मी एंटरप्रायजेस, बंगलोर - 34.084% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.958% जास्त दराची निविदा मे.पर्ल एंटरप्रायजेस, पुणे यांची प्राप्त झालेली आहे. दिनांक 20-3-2007 रोजी मा.आयुक्तांचे दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटी अंती 8.958% जास्त दराऐवजी अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराने काम करण्यास गुत्तेदाराने सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार मे. पर्ल एंटरप्रायजेस यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या सौर संयंत्रे अस्थापीत करण्याच्या योजनेतून औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सोलार स्ट्रीट लाईट/गार्डन लाईट लावण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.पर्ल एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून अं.प. दरापेक्षा 5% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद